cmyk

## संपादकीय

# सर्वसामान्य शेतकऱ्याला फासावर जाण्याची वेळ

हवामानावर आधारित एक रुपयात पिक विमा योजनेमध्ये भ्रष्टाचार करून काही हजार कोटी रुपये अति हुशार मंडळींनी लुबाडल्याचे कारण पुढे करून महाराष्ट्र सरकारने एक रुपयात पिक विमा योजना गुंडाळली आहे. या योजनेच्या भ्रष्टाचारात सुद्धा बीड जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर होता याची चर्चा गेले सहा महिने सुरू आहे. पण या भ्रष्टाचारामुळे जो परिणाम झाला त्याचा गांभीर्याने विचार कोणीच केलेला नाही.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

## अखेर धनंजय मुंडेंची लोकायुक्तांमार्फत होणार चौकशी

पुणेः धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रीपदाचा दुरूपयोग करून निविदा प्रक्रीयेत गैरव्यवहार केल्याची तक्रार अंजली दमानिया यांनी लोकायुक्तांकडे केली होती. त्यांच्या या तक्रारीची दखल लोकायुक्तांनी घेतली असून त्यानुसार, धनंजय मुंडेंची १६ जून रोजी लोकायुक्तांमार्फत चौकशी केली जाणार आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणामुळे टार्गेट झालेले माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर ऑफिस ऑफ प्रॉफिटचेही आरोप झाले. दरम्यान, जनतेतून मोठ्या प्रमाणावर विरोध व्हायला लागल्यानंतर मुंडेंना आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. पण आता त्यांची चौकशी होणार असल्याचे वृत्त आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७ | बुधवार, दि.७ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### कुंभमेळा प्राधिकरण कायदा

मुंबई–प्रयागराजच्या धरतीवर राज्यात मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत चौंडी येथे अनेक निर्णय घेण्यात आले. नाशिकच्या कुंभमेळा साठी कुंभमेळा प्राधिकरण कायदा करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

### शासकीय मेडिकल कॉलेज निर्मितीला मान्यता

अहिल्यानगरः जिल्ह्यात शासकीय मेडिकल कॉलेज निर्मितीला मान्यता दिली. त्याचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असे नाव असणार असून अहिल्यानगर मध्ये शासकीय कॉलेज काढणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

### यशवंत विद्यार्थी योजना राबवणार

मुंबई–धनगर समजातील विद्यार्थ्यांसाठी यशवंत विद्यार्थी योजना राबविण्यात येणार आहे. धनगर समाजातील १० हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतील. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह निर्मिती करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

### मंदिरांच्या विकासासाठी ५५३० कोटी रुपयांचा आराखडा

अहिल्यानगर–चौंडी येथे मंत्रिमंडळ बैठक झाली. चोंडी येथे ६८१ कोटींचा आराखड्याला मान्यता दिली आहे. अखिल भारतीय तीर्थस्थळ म्हणून त्यांना विकसित करण्यात येणार आहे. तुळजाभवानी मंदिर १८६२ कोटी, त्र्यंबकेश्वर२२१ कोटी, महालक्ष्मी मंदिर १४४५, माहूरगड ८२९ कोटी रुपये असे एकूण ५५३० कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली आहे.

### वायू प्रदूषणामुळे पुण्यात दम्याचे रुग्ण वाढले

पुणे –शहरातील वाहनांमुळे वाढलेले वायू प्रदूषण धूळ परागकण धूम्रपान व ऍलर्जी यामुळे दमा वाढण्याचे प्रमाण पुण्यात वाढत आहे. यामुळे अनेकांच्या दम्याचे निदान झाले आहे. पुण्यात गेल्या काही वर्षात दमा होण्याचे प्रमाण २५ ते ३० टक्क्यांनी वाढल्याचे फुफ्फुस विकार तज्ज्ञांचे मत आहे.

### भारतातील कांदा आता थेट कराची न जाता दुबईत

नाशिक – भारतातील कांदा आता थेट कराची न जाता दुबईला पाठवला जात आहे. भारत सरकारकडून पाकिस्तानमधून आयातीला बंदी घालण्यात आली. भारतातून दुबईत जाणारे ३० ते ४० कंटेनर व्हाया कराची जायचे. मात्र आता थेट दुबईतच जाणार आहेत.

# मराठवाड्यात बळीराजावर पुन्हा संकट

## अवकाळीसह गारपिटीचा तडाखा, आणखी पाच दिवस राहणार जोर

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राज्यभरात अवकाळी पावसाने हजेरी लावली असून बीड, गेवराई, जालना, हिंगोलीसह मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. काही भागात गारपीट, वादळी वाऱ्यांची हजेरीही लागली. दरम्यान, मराठवाड्यात पुढील पाच दिवस काही भागात अवकाळी पावसाचा जोर वाढणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.**



राज्यात विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह विविध ठिकाणी सोमवार नंतर मंगळवारी सुद्धा अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा तडाखा बसला. त्यामुळे उन्हाळी ◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यांनी ही काळजी घ्यावी

काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनूसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षीत करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा अॅझाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## ओबीसींचे आरक्षण कायम ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय

# प्रतिक्षा संपली ; चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

### सुप्रीम कोर्टाचे राज्य निवडणूक आयोगाला आदेश

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घ्या, असे आदेश सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. निवडणुका थांबवण्याचे आम्हाला काही कारण वाटत नाही, असे मतही सुप्रीम कोर्टाने नोंदवले. दरम्यान ओबीसींच्या वतीने अॅड.समिर भुजबळ यांनी भक्कम बाजु माडल्याने ओबीसी आरक्षण कायम ठेवण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानी दिला.



गेल्या पाच वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. कोरोना काळ आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणबाबतची याचिका यामुळे निवडणुका खोळंबल्या आहेत. मुंबई, पुण्यासह राज्यातील सर्व महापालिका, जिल्हा ◀◀ पान २ वर

**निवडणुका प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था**
- ✻ महापालिका – २९
- ✻ नगरपरिषद – २२८
- ✻ नगरपंचायत – २९
- ✻ जिल्हा परिषद – २६.

### लोकशाहीचा विजय!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत मी १ एप्रिल २०२५ रोजी संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. आज सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असा स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ''निवडणुका घ्यायच्याच नाहीत का?'' असा थेट सवाल करत न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला निवडणुका घेण्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. हा निर्णय लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मी याला लोकशाहीचा विजय मानतो. माझी राजकीय सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून झाली. त्यामुळे या निवडणुकांबाबत माझे विशेष भावनिक आणि राजकीय नाते आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये जनता नक्कीच योग्य व सक्षम नेतृत्वाची निवड करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

**–खा. बजरंग सोनवणे**

## पोलीस शिपाई रामप्रसाद कडूळे, बाळू बहिरवाळ सेवेतून बडतर्फ

**बीड । प्रतिनिधी**

**पोशि रामप्रसाद कडुळे व पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानी गांजाचे सेवन केलेले पोलीस शिपाई बाळू बहीरवाळ यांना पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सेवेतुन बडतर्फ केले आहे.**

पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असलेले पोलीस शिपाई १४०८ रामप्रसाद शिवनाथ कडुळे यांचेवर २०२४ मध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी ५०००/– रुपये लाच घेतांना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते. त्यानंतर त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. निलंबन कालावधी संपल्यानंतर त्यास पोलीस मुख्यालय येथे नेमणुक देण्यात आली होती. पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असतांना पोशि / कडुळे यांनी पोलीस स्टेशन पिंपळनेर हद्दीतील वाळू चोरीच्या गुन्ह्यात पाहीजे असलेला आरोपी गोरख काळे याचे संपर्कात राहुन त्यास पोलीसांच्या गोपनीय हालचालींची माहीती देणे तसेच त्यास पळवून लावण्यास सहकार्य केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने पोशि कडुळे यास पिंपळनेर पोलीस स्टेशन ठाण्यातील दाखल गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन तो सध्या पोलीस कोठडीत आहेत.

पोलीस शिपाई रामप्रसाद शिवनाथ कडुळे यांचे वर्तन हे गुन्हेगारी स्वरुपाचे असुन पोलीस खात्यास न शोभणारे आहेत. त्यांच्या कृत्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असल्याने आज दिनांक ०६ मे रोजी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी त्यास ◀◀ पान २ वर

## भुजबळांसह समता परिषदेच्या लढ्याला यश-अॅड.सुभाष राऊत

### स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी आरक्षण कायम ठेवल्याबद्दल बीडमध्ये जल्लोष

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ आणि समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याबद्दल समता परिषदेचे



राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष अॅड. सुभाष राऊत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री भुजबळ , ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी , राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून बीड शहरामध्ये समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर फटाके वाजवून आणि पेढे वाटून न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, ◀◀ पान २ वर

## बीडच्या पाण्यासाठी एकनाथ शिंदेंच्या मुख्याधिकाऱ्यांना सुचना

### शिवसेनेच्या तीन्ही जिल्हाप्रमुखांनी पाईपलाईनची केली पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काडी वडगाव येथील प्लांटवर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी आणि मुख्याधिकारी अंधारे मॅडम व अधिकाऱ्यांचे बोलणे करून दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी युद्ध पातळीवर काम करून बीड शहराला पाणीपुरवठा तात्काळ सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे येणाऱ्या काळात बीड शहराला नियमित पाणीपुरवठा होणार आहे.

ज्या कारणांमुळे बीड शहरातल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागला त्या चार पैकी तीन लिकेज चे काम पूर्ण झाले असून आज कमी दाबाने बीड शहराला पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. दोन दिवसांनी पूर्ण क्षमतेने बीड शहराला पाणीपुरवठा सुरळीत होईल असे नगरपालिका सि.ओ. अंधारे मॅडम व एमजीपीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## न्यायाधीशांच्या संपत्तीची माहिती सार्वजनिक

नवी दिल्लीः देशातील न्यायव्यवस्थेमधील पारदर्शकता वाढवणे त्याचबरोबर जनतेचा विश्वास दृढ करणे या दिशेने सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ६ मे) एक ऐतिहासिक पाऊल उचलले. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या संपत्ती आणि कर्जाच्या (दायित्वाच्या) घोषणांची माहिती ◀◀ पान २ वर

## बाजारभाव


**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १०४.०० क्विंटल | २,४२१ | २,९५५ | २,७०१ |
| ज्वारी/हायब्रिड :१३३.०० क्विंटल | १,७०० | २,७३१ | २,१८७ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ६,१०० | ७,००० | ६,५७० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ८५.५० क्विंटल | २,००० | २,७०० | २,४०० |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ६३.५० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ५,४०० | ५,६०० | ५,४४० |

# युद्धाची तारीख अखेर ठरली? बदले की आग अब ना बुजेगी!

## देशभरात आज मॉक ड्रिल; नागरीकांना स्वत:चे संरक्षण करण्याचे दिले जाणार प्रशिक्षण



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

भारत–पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे, केंद्र सरकारने ७ मे रोजी देशभर मॉक ड्रिल आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर हा तणाव चांगलाच वाढला आहे. मॉक ड्रिलमध्ये नागरिकांना युद्ध परिस्थितीत स्वत:चे संरक्षण कसे करावे याबाबत प्रशिक्षण दिले जाईल. तणावाच्या पाश्वभुमीवर पाकिस्तानच्या माजी उपायुक्तांनीच युध्द कधी सुरु होईल, याची थेट तारिख सांगितली आहे. त्यामुळे बदले की आग अब ना बुजेगी म्हणत भारत सुध्दा कोणत्याही क्षणी मर्यादित युद्धाची घोषणा करु शकतो, असे म्हटले जात आहे.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यानंतर आता भारत–पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. सध्या संपूर्ण ◀◀ पान २ वर

### शेवटच्या आठवड्यात मॉक ड्रिलचे आयोजन

१९७१ मध्ये जेव्हा भारत आणि पाकिस्तान युद्ध झाले होते. त्यावेळीही मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. या मॉक ड्रिलनंतर ४ दिवसांनी दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरू झाले होते. त्यावेळी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. ३ डिसेंबरला युद्धाला सुरुवात झाली होती. आता ७ तारखेला मॉक ड्रिल असून युध्द पुढच्याच आठवड्यात सुरु होण्याची शक्यता आहे.

### भारतीय लढाऊ विमानांची ताकद

आता मॉक ड्रिलपूर्वी भारतीय वायुदलाने उत्तर प्रदेशातील गंगा एक्सप्रेस वेवर सराव केला. यात त्यांनी भारतीय लढाऊ विमानांची ताकद दाखवली. गेल्या शुक्रवारी वायुसेनेने एक्सप्रेस वेवर दोन टप्प्यांत अभूतपूर्व लष्करी सराव केला. यात दिवसा आणि रात्री दोन्ही वेळेत उड्डाण भरणे, लँडिंग, टेक–ऑफ आणि कमी उंचीवरून फ्लाई–पास्ट यांसारख्या तंत्रांचे प्रदर्शन करण्यात आले. रात्री ९ ते १० च्या दरम्यान झालेली नाईट लँडिंगही पार पडली. याद्वारे भारतीय वायुसेनेमध्ये अत्याधुनिक क्षमता आहे, याची खात्री पटवून देण्यात आली.

### पाकिस्तानच्या माजी उच्चायुक्ताने सांगितली हल्ल्याची तारीख

भारत रशियाच्या विजय उत्सवानंतर १० किंवा ११ मे रोजी पाकिस्तान विरुद्ध मर्यादीत कारवाई करु शकतो असे पाकिस्तानचे माजी उच्चायुक्त अब्दुल बासित यांनी दावा केला आहे.

cmyk

अग्रलेख

# सर्वसामान्य शेतकऱ्याला फासावर जाण्याची वेळ

हवामानावर आधारित एक रुपयात पिक विमा योजनेमध्ये भ्रष्टाचार करून काही हजार कोटी रुपये अति हुशार मंडळींनी लुबाडल्याचे कारण पुढे करून महाराष्ट्र सरकारने एक रुपयात पिक विमा योजना गुंडाळली आहे. या योजनेच्या भ्रष्टाचारात सुद्धा बीड जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर होता याची चर्चा गेले सहा महिने सुरू आहे. पण या भ्रष्टाचारामुळे जो परिणाम झाला त्याचा गांभीर्याने विचार कोणीच केलेला नाही. त्यात फक्त सरकारचे किंवा कंपन्यांचे पैसे लुबाडले गेलेले नाहीत तर त्यामुळे २७९ शेतकऱ्यांना जीव द्यावे लागले आहेत. त्यांना त्यांच्या हक्काचा विमा मिळाला नाही आणि ज्यांनी लुबाडला त्यांना काही शिक्षा झाली तरीही २७९ कुटुंबाचे पोशिंदे काही परत येणार नाहीत. या पिक विमा योजनेतील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर सरकारने यातून अंग काढून घेतले. पण, या सगळ्या कोलाहलामध्ये सर्वसामान्य शेतकऱ्याला मात्र फासावर जाण्याची वेळ आली आहे.

नव्याने जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार विदर्भ आणि मराठवाड्यात जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत तब्बल २७९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. दुर्दैवाने या आत्महत्यांमध्ये देखील बीड जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. बीडमध्ये ७९, हिंगोलीमध्ये ३७, परभणी जिह्यात ३३, धाराशिव जिह्यात ३१, लातूरमध्ये १८ तर जालन्यामध्ये १३ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपवले आहे. एकट्या मार्च महिन्यात १०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. याचा मागोवा सरकारी यंत्रणांनी घेतला. मराठवाड्यातील तूर, कापूस, सोयाबीन या प्रमुख पिकांना हंगामामध्ये हमीभाव मिळाले नाहीत. हमीभावाहून कमी रकमेने शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकावा लागला. याच काळात झालेल्या अवकाळी आणि अतिवृष्टीमुळे आधीच उत्पादकता घटली होती. त्यात फार मोठा आर्थिक फटका बसला आणि कर्जाचा वाढलेला डोंगर सहन न झाल्याने या शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा मार्ग पत्करला. जर अवकाळी आणि अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान त्यांना पीक विम्यातून भरून निघू शकले असते, जर त्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळाला असता आणि किमान हमीभावाने खरेदी झाली असती तरीसुद्धा त्यांना जगण्याची उमेद उरली असती. कर्जाचे पुनर्गठन किंवा अन्य काही पर्यायी मार्ग त्यांनी शोधले असते. या काळात आधी निवडणुकीत सरकारी पक्षांनी कर्जमाफी देऊ असे आश्वासन दिले होते. त्यामुळे त्यांची आस जागृत झाली होती. पण सत्ताधाऱ्यांनी सत्तेवर येताच त्या घोषणेपासून घुमजाव करण्याची तयारी चालवली होती. पीक कर्ज फेडलेच पाहिजे असे ऐन ३१ मार्चच्या तोंडावर अर्थमंत्र्यांनी जाहीर केले होते. आधीच अवकाळी, अतिवृष्टी आणि तेव्हापासून एक रुपयाच्या पिक विमा योजनेतून आपल्याला काही फायदा होणार नाही अशी शेतकऱ्यांची भावना झाली होती. ज्या लोकांनी खोटेपणाने सरकारी जमिनीवर आणि बिगर शेती प्लॉटवर देखील पिक विमा उतरवून हजारो कोटी रुपये लाटले त्यांना विनासायास विमा मिळाला होता. पण ज्यांनी शेतात काबाडकष्ट करून टिकवलेला शेतमाल ऐनवेळी अवकाळी आणि गारपिटीच्या तडाख्यात सापडला त्यांना मात्र आपण काय पिकवले, किती पिकवले, पिकवले होते का खोटेच कागद रंगवले अशा संशयाला उत्तरे द्यायची वेळ आली होती. परिणामी नुकसान होऊन सुद्धा भरपाई मिळेल असे वातावरण नव्हते. त्यांच्या हक्काचा पैसा भलत्याच मंडळींनी लाटला होता. यात मोठ्या प्रमाणावर सरकारी सहभाग असल्याशिवाय हे होऊ शकत नाही. पुढे राज्याचे कृषिमंत्री आणि त्यांचे पाठीराखे या आणि खंडणी, खून प्रकरणात अडचणीत आले. पाठीराखे तुरुंगात गेले, कृषिमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पण, त्यामुळे शेतकऱ्याचा काही लाभ झाला नाही. त्याला काही पिक विमा मिळाला नाही. सरकारने जितकी रक्कम खर्ची करायची त्याहून कितीतरी अधिक रक्कम भरली. पण ती सगळी खोट्या पंचनामा केलेल्या पिक विम्याच्या लाभार्थ्यांना हजारो कोटींचा लाभ मिळवून देण्यासाठी उपयोगात आली. खऱ्याखुऱ्या शेतकऱ्यांच्या गळ्यात फासच तेवढा अडकला. महाराष्ट्रात गेलेले हे २७९ बळी जगभरातील एखाद्या युद्धामध्ये पडावेत इतके बळी आहेत. कारण, ही आकडेवारी पुढे आली तरी त्यातून साध्य काही होणार नाही. इथे रोजच लोक मरतात. त्यांचा शोक किती मानायचा? अशी इथल्या सरकारी यंत्रणेची धारणा झालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा ना सरकार नावाच्या यंत्रणेला ना प्रशासन नावाच्या व्यवस्थेला अस्वस्थ करतो. शेतकऱ्याच्या समोर जेव्हा ही माहिती येते तेव्हा तो तेवढ्यापुरता हळहळतो आणि पुन्हा आपली आव्हाने पेरण्यासाठी मान खाली घालून राबू लागतो. बोगस पिक विमा दाखवून हजारो कोटीची रक्कम काही मंडळींनी लाटली. विदर्भ, मराठवाड्यात खऱ्याखुऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी तेवढी रक्कम वाटली गेली असती, पंचनामे वेळोवेळी झाले असते आणि भरपाई लगेच मिळाली असती तर या आत्महत्या झाल्या नसत्या. पण सरकारी पैसा आणि कंपन्यांचे धन चोरांनी मलिदा म्हणून लाटला. तिकडे हेतूत: दुर्लक्ष करणाऱ्यांना शेतकऱ्यांना याचा लाभ द्यावा असे वाटले नाही, त्यांची संवेदनहीनता अशा प्रकारातून उघड होते. विधिमंडळात आमदार धस यांनी आवाज उठवला म्हणून हे प्रकरण चर्चेत तरी आले. सरकार कोणाचेही सत्तेवर येवो महाराष्ट्राचा शेतकरी आत्महत्येचा कलंक काही हटायला तयार नाही. आतापर्यंत पीक विमा रकमेचा फायदा कंपन्यांना व्हायचा. तेवढीच रक्कम यंदा सरकारी गुन्हेगारांनी लुबाडली आणि त्याची कोणाला शंका देखील आली नाही. याचा अर्थ जेवढा पैसा काढायचा होता तेवढा काढलाच आहे. पीक विमा कंपन्या नव्या घोटाळ्यात सामील व्हायला आणि झारीतील शुक्राचार्य नव्याने शेतकऱ्याची अडवणूक करायला सज्ज आहेत. सरकार या योजनेतून सटकून नव्या योजनेत अडकेल आणि नव्या कारणांनी पुन्हा शेतकरी फासावर लटकेल हे पुन्हा पुन्हा होऊ द्यायचे का?

# विद्यार्थी मित्रांनो दहावी आणि बारावी परीक्षा म्हणजेच आयुष्यात सर्व काही नाही

'विद्यार्थी मित्रांनो आणि पालकांनो लवकरच जीवनातील महत्वाचे टप्पे असलेल्या दहावी आणि बारावीचा निकाल आता लागणार आहे. अनेक विद्यार्थी, पालक निकाल कसा लागणार या काळजीने सध्या चिंताग्रस्त चेहऱ्याने फिरत आहेत. आपल्या शिक्षण पद्धतीत शिक्षण हे केवळ नौकरी मिळविण्याचे खात्रीशीर साधन म्हणून पाहिले गेल्याने या परीक्षांना विनाकारण अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. या परीक्षा नक्कीच महत्वाचे टप्पे आहेत. पण, तेच सर्व काही नाही.' दहावी आणि बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले यांचे मौलिक मार्गदर्शन..! वाचकांच्या माहितीस्तव देण्यात येत आहे.

दहावी आणि बारावी या परीक्षा केवळ पुढील शिक्षणासाठी किंवा करियरच्या संधीसाठी एक आधारभूत भूमिका बजावतात. पण, त्या आपल्या सर्व जीवनाचे किंवा यशाचे पैलू निश्चित करीत नाहीत. वास्तविक पाहिले तर इतर परिक्षांप्रमाणे याही साधारण परीक्षाच आहेत. पण, केवळ आपल्या देशातील करियरच्या वाटा या परिक्षानंतर ठरविल्या जातात म्हणून हे महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अकारण परीक्षार्थी, पालक, शिक्षक यांनाही याचा ताणतणाव येत आहे. दहावी आणि बारावीचा निकाल आणि मानसिकता याचे विश्लेषण करणे मला आता अत्यावश्यक वाटत आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर परीक्षेच्या निकालाचा कसा परिणाम होतो, हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. निकालाची प्रतीक्षा, निकाल लागल्यावर होणारी प्रतिक्रिया आणि त्यातून होणारे भावनिक बदल या सारख्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीचा निकाल लागण्याची वाट पाहणे ही एक तणावपूर्ण प्रक्रिया असू शकते. यात विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना ताणतणाव, उदासीनता, उत्सुकता, कुतूहल, भीती या संमिश्र भावना असू शकतात. निकाला नंतरची प्रतिक्रिया विविध प्रकारची असू शकते. निकाल लागल्यावर विद्यार्थी आनंद, निराशा किंवा आश्चर्य व्यक्त करू शकतात. निकालाचे परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि भविष्यावर परिणाम करू शकतात. निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता, किंवा तणाव येऊ शकतो. काही विद्यार्थी चांगले निकाल मिळवूनही आत्मसमर्पणाच्या भावनांशी संघर्ष करू शकतात. काही विद्यार्थी नकारात्मक विचार आणि तुलना करू शकतात, ज्यामुळे त्यांना आत्मसमर्पणाची भावना येऊ शकते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन असणे महत्त्वाचे आहे. त्यांना आपल्या चुकांमधून शिकण्याची आणि भविष्यासाठी तयारी करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे. त्याकरिता पालक, शिक्षक, जेष्ठ, श्रेष्ठ, नातेवाईक व्यक्तींकडून त्या विद्यार्थ्याला सामाजिक पाठबळ, मानसिक बळ मिळाले पाहिजे. त्यांच्या मनात काय चालू आहे हे पालकांनी जाणीवपूर्वक काढून घेतले पाहिजे किंवा ते व्यक्त करण्यासाठी आपल्या पाल्याला प्रवृत्त केले पाहिजे. विद्यार्थी त्यांच्या मित्र, कुटुंब आणि शिक्षकांकडून सामाजिक पाठबळ मिळवू शकतात. त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याची आणि मदतीसाठी विचारण्याची आवश्यकता आहे. पालकांना अथवा विद्यार्थ्याला गरज वाटल्यास, मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. ते विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि समर्थन देऊ शकतात. मानसिक आरोग्यासाठी काही महत्वाच्या टिप्स खालीलप्रमाणे आहेत. निरोगी जीवनशैली आवश्यक आहे. नियमित व्यायाम, पौष्टिक आहार आणि पुरेसा आराम घेणे आवश्यक आहे. ध्यान आणि योगा करून मनाला शांत करू शकतो. ध्यान आणि योग केल्याने तणाव कमी होऊ शकतो आणि मानसिक शांतता मिळू शकते. सामाजिक संवाद असणे आवश्यक आहे. कारण, मनातला कोंडमारा इतरांना सांगितल्याने मन मोकळे होते. मनातले द्वंद्व, प्रश्न सोडविण्यास इतर व्यक्तीचे मार्ग, पर्याय उपलब्ध होतात. मित्र आणि कुटुंबियांसोबत वेळ घालवणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे.यामुळे एकांतात येणारे नकारात्मक विचार नष्ट होतात किंवा इतरांसोबत हे विचार बोलता येतात. गरज वाटल्यास, मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत मागा. सकारात्मक विचार करणे आणि आत्मविश्वास असणे महत्त्वाचे आहे.या सर्व बाबींवरून खालील निष्कर्ष आपण काढू शकतो. दहावी आणि बारावीचा निकाल विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर मोठा प्रभाव टाकू शकतो. या काळात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि समर्थन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याच्या समस्या असल्यास, तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा केवळ एक आधारभूत भूमिका बजावतात आणि तुम्हाला पुढील शिक्षणासाठी आणि करिअरसाठी तयार करतात आपण आपल्या आवडीचे आणि क्षमतांचे पालन करून वेगवेगळ्या मार्गांनी आपले जीवन यशस्वी करू शकतो. उदाहरणार्थ काही विद्यार्थी चांगले गुण मिळवितात पण, त्यांना आवडत्या क्षेत्रात काम करायला संधी मिळत नाही काही विद्यार्थी दहावी - बारावीत चांगले गुण मिळवितात. पण, त्यांना उच्च शिक्षण किंवा चांगली नौकरी मिळत नाही. काही विद्यार्थी दहावी - बारावीत चांगले गुण मिळवितात व आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम ही करतात आणि यशस्वी होतात.



**डॉ.राजेश इंगोले**
(मानसोपचार व विद्यार्थी समुपदेशक तज्ज्ञ, अंबाजोगाई.)
मो.९४२२२४०७१०

## घाटगे पाटलांनी आंदोलनाचा इशारा देताच पाटबंधारे विभागाने सोडले पाणी

अंबड । प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्षाचे नेते सतीश घाटगे यांनी यांनी आंदोलन करण्याचा इशारा देताच पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांसाठी पाणी सोडले. श्री घाटगे यांनी शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी केलेले आंदोलन आणि जायकवाडी पाटबंधारे विभागाकडे केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला आहे. तळणेवाडी सीआर गेटमधून शाहगडच्या बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले असून, या निर्णयामुळे गोदाकाठच्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**

मागील काही काळापासून गोदाकाठ परिसरातील शेतकरी पाण्याची मागणी करत होते. पिकांना पाण्याची नितांत गरज असतानाही पाणी मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. या पार्श्वभूमीवर, सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. तसेच, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून वस्तुस्थिती मांडली होती आणि तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. अखेरीस, या प्रयत्नांना यश आले असून, आज सायंकाळपर्यंत तळणेवाडी सीआर गेटमधून शाहगड बंधाऱ्याच्या दिशेने पाणी प्रवाहित झाले. यामुळे परिसरातील ऊस, फळबागा आणि इतर पिकांना जीवदान मिळणार आहे. पाण्याची तीव्र अडचण दूर झाल्याने गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत. ''साहेब, तुमच्या प्रयत्नांमुळेच पाणी आले, आम्ही आपले ऋणी आहोत,'' अशा भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. या यशस्वी पाठपुराव्याबद्दल समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी समाधान व्यक्त केले असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. तसेच, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले.



## बीडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय; नाशिकच्या पीडितेची सुटका

### चालकाला बेड्या : बीड शहर पोलिसांची कारवाई

बीड। पतिनिधी

**शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सारडा कॅपिटलमधील एका तळघरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय चालू होता. ही माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास कारवाई केली. यामध्ये चालकाला बेड्या ठोकल्या असून नाशिकच्या पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे.**

प्रमोद सदाशिव शेळके (रा.नेकनूर ता.बीड) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात एका कोपऱ्यातील तळघरात ब्लीस नावाचे स्पा सेंटर आहे. याच ठिकाणी मागील काही दिवसांपासून वेश्या व्यावसाय सुरू असल्याची माहिती होती. मंगळवारी सायंकाळी बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहकाला एक हजार रूपये देत स्पा सेंटरमध्ये पाठविले. आतमध्ये वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा मारला. यात एका पीडितेची सुटका करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखलची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरचे पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, मनोज परजणे, अशपाक सय्यद, सुशेन पवार, सचिन अलगट, रेश्मा कवळे आदींनी केली.

## पान १वरून...

पान १वरून...

### मराठवाड्यात बळीराजावर

पिकांचे नुकसान झाले. मराठवाड्यात वेगवेगळ्या ठिकाणी पावसादरम्यान वीज कोसळून सोमवारी तिघांचा मृत्यू झाला. या अवकाळीत शेतकऱ्यांच्या उन्हाळी मूग आणि भुईमुगाचे नुकसान झाले आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर आणि परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट आणि पाऊस झाल्यामुळे फळबागा आणि शेतीचे मोठे नुकसान झाल्याने मराठवाड्याती शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे. आता मराठवाड्यात दि.०९ ते १५ मे २०२५ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुणे, सातारा, सांगली या जिल्ह्यांत बुधवारपर्यंत 'यलो ॲलर्ट' देण्यात आला आहे. ०७ व ०८ मे रोजी नांदेड, लातूर व धाराशिव जिल्हयात जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ४० ते ५० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ९ व १० मे रोजी मराठवाडयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील तीन दिवसात कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने घट होऊन त्यानंतर २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची तर पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही.

---------

### पोलीस शिपाई रामप्रसाद कडूळे,

भारतीय संविधान चे कलम ३११ (२) (ब) अन्वये पोलीस सेवेतुन बडतर्फ केले आहे. त्याचप्रमाणे सध्या पोलीस अधीक्षक यांचे निवासस्थानाचे बांधकाम दुरुस्तीचे काम सुरु आहे. सदर ठिकाणी पोलीस मुख्यालयातील अंमलदार पोशि बाळु गहिणीनाथ बहीरवाळ हे सुरक्षा रक्षक म्हणुन नेमलेले होते. दिनांक ०४ मे रोजी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे निवासस्थानाचे दुरुस्तीचे कामकाज पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी पोलीस अधीक्षक निवासस्थानाचे मुख्य गेट उघडण्यासाठी बराच वेळ हॉर्न वाजवला परंतु ड्युटीवरील अंमलदार यांनी गेट उघडले नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी त्यांचे अंगरक्षक यांना ड्युटीवरील अंमलदार दरवाजा का उघडत नाही हे पाहण्याचे सांगीतले. त्यावेळी पोलीस अधीक्षक यांचे अंगरक्षकाने उतरुन गेट वाजवुन व आवाज दिला. त्यानंतर थोड्या वेळानंतर पोशि बहीरवाळ यांनी गेट उघडले. गेट उघडण्यासाठी एवढा वेळा का लागला याबाबत पोलीस अधीक्षक यांनी बहीरवाळ यांचेकडे चौकशी केली असता गांजाची नशा केली असल्याचे पोलीस अधीक्षक यांचे निदर्शनास आले. त्यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांना बोलावुन पोशि बहीरवाळ यांची वैद्यकीय तपासणी केली असता वैद्यकीय तपासणी पॉझीटीव आल्याने पोशि बाळु गहिणीनाथ बहीरवाळ यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई बाळु गहिणीनाथ बहीरवाळ यांचे वर्तन हे गुन्हेगारी स्वरुपाचे असुन पोलीस खात्यास न शोभणारे आहेत. त्यांच्या कृत्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असल्याने आज दिनांक ०६ मे रोजी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी त्यास भारतीय संविधान चे कलम ३११(२) (ब) अन्वये पोलीस सेवेतुन बडतर्फ केले आहे. पोलीस हे कायद्याचा रक्षक आहेत. त्यामुळे पोलीसांच्या कोणत्याही बेकायदेशीर, गुन्हेगारी कृत्यास कदापी खपवुन घेतले जाणार नाही. कोणताही पोलीस अधिकारी किंवा अंमलदार कोणत्याही बेकायदेशीर किंवा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी आढळुन आल्यास त्यांचेवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक नवनीत काँत यांनी दिला आहे.

--------------

### प्रतिक्षा संपली ; चार महिन्यात

परिषद, नगरपरिषद, पंचायत समितींमध्ये प्रशासनराज सुरू आहे. मंगळवारी सुप्रीम कोर्टात न्या. सूर्यकांत आणि न्या. एन. के सिंह यांच्या पीठासमोर महाराष्ट्रातील निवडणुकासंदर्भात सुनावणी झाली. सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला अधिसूचना काढून चार महिन्यात निवडणुका घ्या असे आदेश दिले. बांठिया आयोगाच्या अहवालात इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के आरक्षणाची शिफारस न करता लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची शिफारस करण्यात आली होती. यामुळे महापालिकांमध्ये ओबीसी जागांची संख्या कमी होणार आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. २०२२ मधील बांठिया आयोगाच्या अहवालाच्या आधारे निवडणुका न घेता त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारे घेतल्या जाव्यात, असेही सुप्रीम कोर्टाने मंगळवारच्या सुनावणीत स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी माध्यमांना सांगितले की, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार निवडणुका घ्यायच्या झाल्यास ज्या भागात जुलैमध्ये कमी पाऊस पडतो तिथे आधी निवडणूक पार पडेल आणि नंतर उर्वरित भागात मतदान प्रक्रिया पार पडेल. साधारण सहा महिन्यात राज्यभरात निवडणूक पार पडतील.

**प्रशासनराज वरून सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला फटकारले**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील प्रशासनराज यावरूनही सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला फटकारले. यात काही लॉजिक आहे का? सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय हे प्रशासन घेत आहे. आरक्षणासंदर्भातील याचिकांमुळे लोकशाही प्रक्रियाच खोळंबली आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सर्वाधिकार आहेत. काही ठिकाणी असे दिसतेय की हे अधिकारी मोक्याच्या ठिकाणच्या जागा विकत आहेत किंवा भाडेतत्त्वावर देताहेत याकडेही सुप्रीम कोर्टाने लक्ष वेधले.

**देशात आरक्षणाचा खेळ रेल्वेसारखा - सुप्रीम कोर्ट**

'देशातील आरक्षण व्यवस्था ही आता रेल्वेच्या डब्यासारखी झाली आहे. जे प्रवासी डब्यात चढले आहेत, ते इतरांना आत येवू देत नाहीत,'' अशी टिप्पणी मंगळवारी (दि.६ मे) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणासंदर्भातील खटल्याच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी केली. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१६-१७ मध्ये पार पडल्या होत्या. २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारने ओबीसीसाठी लागू केलेला २७ टक्के आरक्षणाचा अध्यादेश रद्द केला होता. ओबीसी उमेदवारांसाठी कोट्याच्या मुद्द्यावर सुरु असलेल्या कायदेशीर लढाईमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना विलंब झाला आहे.

-------------

### न्यायाधीशांच्या संपत्तीची माहिती

सार्वजनिक केली आहे. ही माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहे. इतिहासात प्रथमच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संपत्तीची घोषणा सार्वजनिक झाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि २० इतर न्यायाधीशांची माहिती अपलोड करण्यात आली आहे. यामध्ये भावी तीन सरन्यायाधीशांचाही समावेश आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी कथितरित्या रोख रक्कम सापडली. यानंतर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखाील खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संपत्ती सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला होता.

----------

### भुजबळांसह समता परिषदेच्या लढ्याला

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत माजी खासदार समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ॲड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली. या लढ्याला यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सन २०२२ च्या पूर्वी असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. ओबीसी, भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. गेल्या आठवडाभरात ओबीसींच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे दोन निर्णय झाले असल्याने ओबीसी समाजात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय, तसेच सुप्रीम कोर्टाने दिलेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निर्णय हे ओबीसींच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्वाचे आहेत असे प्रतिपादन समता परिषदेचे राज्य सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचे स्वागत करत बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्री माता फुले यांच्या पुतळ्यासमोर बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला असून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटप करण्यात आले. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, परीट समाजाचे नेते गणेश जगताप, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, धनगर समाजाचे नेते रणजीत सोन्नर, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, मोहनराव गोरे, महेश व्यवहारे, निलेश राऊत, पांडुरंग सत्वधर, अजय काळे, रोहित जमदाडे, मंगेश जमदाडे, महेश चौधरी आदींसह समता सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

-----------

### युद्धाची तारीख अखेर ठरली?

जगभरात भारत-पाकिस्तान युद्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना ७ मे रोजी मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले आहेत. देशभरातील जवळपास २४४ जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिल होणार आहे. भारतात १९७१ नंतर पहिल्यांदाच मॉक ड्रिल होणार असून यादरम्यान सायरनही वाजवला जाणार आहे. जर भारत पाकिस्तान युद्ध झाले तर नागरिकांनी या युद्धावेळी स्वत:ला सुरक्षित कसे ठेवावे याचे प्रशिक्षण देण्यासाठी मॉक ड्रिल असणार आहे. त्यातच आता भारत-पाकिस्तान युद्धाची तारीख निश्चित झाल्याचे बोलले जात आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या तणावाचे वातावरण आहे. कोणत्याही क्षणी भारताकडून युध्द सुरु केले जाण्याची दाट शक्यता आहे. याच पार्श्वभुमीवर माजी पाकिस्तानी उच्चायुक्त अब्दुल बासित यांनी नुकतेच एक विधान केले आहे. सध्या भारत युद्धाची जोरदार तयारी करत आहे. त्यामुळे येत्या १० किंवा ११ मे रोजी भारत पाकिस्तानवर हल्ला करु शकतो, असे अब्दुल बासित यांनी म्हटले आहे. तसेच पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनीही याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. भारत कधीही काश्मीर बॉर्डरवर लष्करी हल्ला करू शकतो. तसेच पाकिस्तानच्या एका मंत्र्याने इस्लामाबादमध्ये केलेल्या वक्तव्यानुसार भारत नियंत्रण रेषेवर कधीही हल्ला करु शकतो. नवी दिल्लीला याचे जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, असे ते म्हणाले. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानामध्ये १० किंवा १२ मे रोजी दरम्यान प्रत्यक्षात मर्यादित युध्दाला सुरुवात होण्याची शक्यता असल्याचे दिसते. पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट असून यह आग अब ना बुजेगी असे चित्र दिसत आहे.

-----------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०७ मे २०२५

३


## वेदिका साळुंके हिला बारावी परीक्षेत ८६ टक्के गुण

बीड । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील शिवनी हायस्कूल शिवनी या केंद्रातून परीक्षेस बसलेल्या वेदीका साळुंके या विद्यार्थिनीला बारावीच्या बोर्ड परीक्षा ८६.१७ टक्के गुण मिळाले.

नुकताच बारावीचा निकाल जाहीर झाला असून वेदिका नेमिराज साळुंके हिला इंग्रजीमध्ये ७६, हिंदीत ९३, गणितामध्ये ९२, भौतिक शास्त्रात ६४, रसायनशास्त्रात ८९,तर जीवशास्त्रामध्ये ९३ असे ६०० पैकी ५१७ गुण मिळाले. या तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांची वेदीका पुतणी आहे. पत्रकार संघाच्या वतीने ही तिचे अभिनंदन करण्यात आले. मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, संपादक राजेंद्र होळकर, ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावस्कर ,दैनिक राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे, वृत्तसंपादक अनिल जाधव, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक तथा संपादक अभिमन्यू घरत, तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, निमंत्रक मंगेश निटुरकर आदिंनी अभिनंदन केले.

## ‘एआय’च्या सहाय्याने महाराष्ट्र अन्नधान्य निर्यातीत सर्वोत्तम ठरू शकतो -देबजानी घोष

मुंबई । प्रतिनिधी

**‘एआय’चा वापर करून महाराष्ट्र अन्नधान्य उत्पादनात आणि निर्यातीत जगातील सर्वोत्तम राज्य बनू शकतो, असा विश्वास निती आयोगाच्या फेलो आणि नॅसकॉमच्या माजी अध्यक्षा देबजानी घोष यांनी व्यक्त केला.**

टेक वारी महा तंत्रज्ञान प्रशिक्षण सप्ताह अंतर्गत मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर तंत्रज्ञान या विषयावर त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला उपस्थित होत्या. मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देबजानी घोष म्हणाल्या, ‘‘सध्या जग अन्नधान्याच्या तुटवड्याच्या संकटाला सामोरे जात आहे. महाराष्ट्राकडे तज्ज्ञ, कृषी उपकरणे, प्रशिक्षित कामगार आणि नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता आहे. योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीद्वारे राज्य अन्नधान्याच्या जागतिक निर्यातीत आघाडीवर राहू शकते. नवीन तंत्रज्ञान, सुधारित बियाणं, ड्रोन, सिंचन प्रणाली यांचा वापर करून कृषी क्षेत्रात उत्पादनक्षमता वाढवता येईल.

२०२० ते २०३० हे दशक कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) पर्व असणार आहे. कृषी, आरोग्य, ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रात ‘एआय’च्या साहाय्याने मूलभूत बदल घडवता येऊ शकतात. बायोटेक म्हणजे जीवशास्त्र आणि ‘एआय’ यांचा संयोग आहे. बायोटेक म्हणजे जीवन नव्याने घडविणे होय. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा पाया म्हणजे ‘आयआयटी’ मुंबईसारखी शिक्षणसंस्था, स्टार्टअप इकोसिस्टम, उद्योगजगत, डिजिटल इकॉनॉमी, ग्रीन एनर्जी आणि प्रगत धोरणे यामुळे राज्य देशाच्या ‘जीडीपी’मध्ये मोठा वाटा उचलू शकते. असेही त्यांनी सांगितले. आर. विमला यांनी सांगितले की, फक्त ‘एआय’वर अवलंबून राहून चालणार नाही, तर विज्ञान आणि ‘एआय’ व इतर आघाडीच्या तंत्रज्ञानांच्या साहाय्याने उद्योग आणि कृषी क्षेत्रात ठोस योजना आखून काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी सांगितले.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ७१.५० टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी विज्ञान परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे यामध्ये प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कु.यादव मंजुळा प्रकाश हिने ७१.५० % मार्क घेऊन घवघवीत यश संपदान केले आहे.**

तालुक्यातील माजलगाव तेलगाव हायवे लगत सावता नगर पात्रुड येथे रहिवासी असलेल्या गरीब कुटुंबातील परिस्थितीला मात करत कसल्याही प्रकारचे क्लास न लावता बारावी विज्ञान परीक्षेमध्ये ७१.५० टक्के मार्क्स घेऊन घवघवीत यश संपादन केले तिच्या या यशाबद्दल तिचे आई-वडील मित्र-मैत्रिणी कॉलेज प्रशासन नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.वडिल प्रकाश यादव, व आई सौ सविता प्रकाश यादव यांची परिस्थिती हालाखीची असताना देखील खचून न जाता दिवस-रात्र कबाड कष्ट मेहनत करून आपल्या पोटाला चिमटा घेत तिनी ही कन्याला उच्च शिक्षण दिले आणि त्यांचे यशस्वी संगोपन केल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.



पान ६ वरून...

### यशवंत विद्यालयाच्या मीरा

प्रिय शिक्षिका श्रीमती मीरा बबनराव लांडगे मॅडम यांची निवड करण्यात आली होती. सदरील या मानाच्या पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक ०४ मे रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये भव्यदिव्य कार्यक्रमात थाटामाटात दै लोकाशाचे संपादक विजयराज बंब, बीड तहसीलचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठविधीज्ञ जयंतराव राख, वाहतूक शाखेचे जिल्हा पोलीस निरीक्षक सुभाष सानप, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे मॅडम, वडवणीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, शालेय संस्थाचे अध्यक्ष उत्तमराव पवार सर, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक गणेश वाघ सर, शिरूर तालुक्यातील ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल जाधव, महाविद्यालय खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा साहित्यीक गौतम गायकवाड, पद्मपाणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा संपादक दिलीप तरकसे, प्रतिष्ठानच्या सचिव सिंधुताई तरकसे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल मॅडम, समाज कल्याण वरिष्ठ निरीक्षक सहाय्यक आयुक्त कविता गायकवाड मॅडम, महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष नवनाथ पोटभरे, चंपावती विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य हौसराव पवार , रायमोहाचे विद्यमान सरपंच तथा उद्योजक सुभाष क्षीरसागर, लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, ॲड राजेश तांगडे, प्राचार्य देवीदास निकाळजे सर, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार इंगळे, शासकीय निवासी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता जावळे या प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन श्रीमती मीरा बबनराव लांडगे यांना सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती मीरा लांडगे मॅडम यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ, संस्थापक सचिव श्री गोविंदरावजी वाघ, संस्थेचे अध्यक्ष तथा यशवंत विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक श्री गणेश वाघ सर, सचिव श्री नामदेवराव वाघ प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री धुमाळ सर यांच्यासह यशवंत विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### जिल्ह्यात १ हजार

समिती नेमत चौकशीचे आदेश दिले मात्र या चौकशी समितीला कितपत बोगस प्रवेश रोखण्यात यश आले आहे हे मात्र गुलदस्त्यात आहे. त्यामुळे शिक्षण विभागाकडून फक्त कागदी घोडे नाचवत बोगस प्रवेशाला एक प्रकारे खतपाणी घालण्याचे काम केले जात आहे. तेव्हा झालेल्या बोगस प्रवेशा संदर्भात उच्चस्तरीय चौकशी नेमण्यात यावी अशी मागणी आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे. असे झाले प्रवेश मुख्य निवड फेरी - १५७८ प्रवेश, प्रतीक्षा फेरी क्र. १ - २२४ प्रवेश, प्रतीक्षा फेरी क्र.२- १३४ प्रवेश, प्रतीक्षा फेरी क्र. ३ - २९ प्रवेश

### ओ.बी.सी पालकांनो सावधान

प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, प्रमाणेच भटक्या विमुक्ताचे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना बाबतच्या किचकट अटी रद्द करून ही योजना प्रभावीपणे राबवण्यात यावी तसेच भटक्या नियुक्त साठी असलेली शहरी ग्रामीण पंतप्रधान आवास योजना गर्जेवंत पर्यंत पोहोचवावी, जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यात भटके विमुक्त हिंदू मुस्लिम ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे बाधण्यात यावी, स्कॉलरशिप चे वाटप करावे व इतर महामंडळाप्रमाणे वसंतराव नाईक महामंडळाला आर्थिक निधीची तरतूद करावीत, भटकंती करणाऱ्यांना शासकीय योजना व शैक्षणिक गरजेसाठी असलेले जात प्रमाणपत्र, राशन, कार्ड, आधार, कार्ड, पॅन, कार्ड, मतदान कार्ड, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र व इतर साठी जिल्हाधिकारी मार्फत तहसीलदार तलाठी ग्रामसेवक मुख्याधिकारी यांना आदेशित करून ज्या ठिकाणी या समूहाचे वास्तव्य असलेल्या वस्ती वाढे तांडे पाडे आहे या ठिकाणी जाऊन प्रमाणपत्र वाटप करावे या घटकासाठी राशन कार्ड संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना घरकुल योजना शौचालय योजना इत्यादी योजनेत लाभ मिळणे गरजेचे आहे, केंद्र व राज्य शासनाने राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार कलम ३४० अन्वये अनेक आयोग कमिटी समित्या गठीत केलेल्या होत्या जसे कालेलकर आयोग, अग्रवाल आयोग, बापट कमिशन, विधाते आयोग, रेनके आयोग, सच्चर समिती, मुंशी समिती, खाडे समिती, अंत्रोळीकर समिती इत्यादीच्या शिफारशी लागू करून या हिंदू मुस्लिम ओबीसी भटके विमुक्त जाती जमातीच्या समूहांना न्याय देण्यासाठी आपण संबंधितांशी पत्रव्यवहार करून आमच्या निवेदनाद्वारे सादर केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात अशी मागणी हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटके- विमुक्त संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देण्यात आले आहे यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव, शहराध्यक्ष खुर्शीद आलम, ओबीसी जिल्हाध्यक्ष शेख जाकेर,मोमीन खालेद,गुलाम जहाँगीर,मनोज चव्हाण, वजीर आत्तार,विजय गायकवाड,फारोक मन्यार, अशोक दुधाड, हकीम मन्यार, नबिल उजमा,मनोज चव्हाण,मजीद भाई, सुर्यकांत जोगदंड, शकील इनामदार,सलाम सेठ, दत्ता जाधव, सैय्यद फेरोज, भिमराव हाळे, अजहर सौदागर, अब्बास इनामदार,प्रशांत डोरले, मोईज भाई यांच्या सह अनेक हिंदू मुस्लिम ओबीसी बांधव उपस्थित होते,

## पाटबंधारेच्या अधिकाऱ्यांना घाटगे पाटलांचा अल्टिमेटम बंधाऱ्यात पाणी सोडा नसता आज तीव्र आंदोलन

जालना । प्रतिनिधी

**अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावरील गावांमध्ये दुष्काळाची दाहकता वाढली आहे. पाथरवाला, शहागड, मंगरूळ, शिवणगाव, जोगलादेवी येथील बंधारे पूर्णपणे कोरडे पडल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहेत. अशा स्थितीत पाटबंधारे विभाग पाणी सोडण्यास टाळाटाळ करत आहे. दोन दिवसांपूर्वी उजव्या कालव्याची सीआरगेट उघडून पाणी खुली करणारे सतीश घाडगे यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता अधिकाऱ्यांना निवेदन देत निर्वानिचा इशारा दिला आहे दोन दिवसात अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील बंधाऱ्यांमध्ये पाणी न सोडल्यास आज सात मे रोजी शेतकऱ्यांसोबत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी निवेदनात दिला आहे.**



अंबड घनसांगी तालुक्यातील गोदाकाच्या गावाततील शेतकऱ्यांची पिके आणि फळबागा उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याअभावी जळून खाक होत आहे.जनावरांना चारा आणि पाणी मिळत नसल्याने त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. दोन दिवसांपूर्वी संतप्त शेतकऱ्यांनी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली उजव्या कालव्याचे सी.आर. गेट उघडून प्रशासनाला आपल्या असंतोषाची झलक दाखवली. त्यानंतरही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याच्या हालचाली केल्या नाही. या गंभीर परिस्थितीमुळे त्रस्त झालेल्या गोदाकाठच्या शेतकऱ्यांसाठी सतीश घाटगे यांनी सोमवारी जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांची भेट घेऊन तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली. जर येत्या दोन दिवसांत जायकवाडीच्या उजव्या व डाव्या कालव्यातून या बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याचे आदेश निर्गमित केले नाही,तर दोन्ही तालुक्यातील हजारो शेतकरी आज ७ मे रोजी जायकवाडी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. यावेळी शिवाजी मोरे, पुरुषोत्तम उढाण , राजेंद्र छल्लारे उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या या मागणीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हुतात्मा देवराव विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा यांनी यावर्षीही उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.९३% तर कला शाखेचा निकाल ९०% लागला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर व संस्था सचिव तथा भायाळाच्या सरपंच सत्यभामाताई बांगर व युवा नेते विजयसिंह बांगर यांनी सर्व विद्यार्थ्यांसह प्राचार्य व प्राध्यापक यांचे अभिनंदन केले आहे.

फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.९३% तर कला शाखेचा ९० टक्के निकाल लागला असून विज्ञान शाखेतून अनपट सायली बाळासाहेब हिने ८९.८३% मिळवत प्रथम, इप्पर श्रद्धा सूरज ८८% गुण मिळवत द्वितीय, बांगर भक्ती सुरेश ८७.५० गुण मिळवत तृतीय, बांगर वैष्णवी बबनराव ८६.५० चतुर्थ, गर्जे सृष्टी संदीप ८६.५० गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला आहे, तसेच कला शाखेतून गायकवाड अशोक शहादेव याने ७३ टक्के गुण मिळवत प्रथम, बावणे माऊली पाराजी ६८.५०% गुण मिळवत दुतीय तर बांगर माधुरी ६८.३५% गुण मिळवत तृतीय तर मंत्रे सोमेश्वर राजेभाऊ ६७.००% गुण मिळवले असून ६० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे, तर उर्वरित विद्यार्थी प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झाले आहेत. तरएकूण विद्यालयाचा निकाल ९७.३६ टक्के लागला. महाविद्यालयाच्या या नेत्रदीप यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, सरपंच सत्यभामाताई बांगर, युवा नेते विजयसिंह बांगर प्राचार्य दिनकर बांगर, प्राध्यापक प्रज्ञा नाईकवाडे, प्राध्यापक शिरीष कोल्हे, प्राध्यापक विलास पवार, प्राध्यापक राहुल जामकर, प्राध्यापक सचिन पवार, यांच्यासह सर्व विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## बोर्ड परीक्षेत रयतच्या उज्वल यशाची परंपरा कायम

### बारावी विज्ञान शाखेचा ९८.७९ % तर कला शाखेचा ९०.९०% निकाल

अंमळनेर । प्रतिनिधी

**अंमळनेर (भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै.प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयाने याहीवर्षी एच.एस.सी. परीक्षेतील उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.७९% लागला असून कला शाखेचा निकाल ९०.९०% लागलेला आहे.**

फेब्रुवारी/मार्च-२०२५ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेमध्ये कै.प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.७९% लागला असून कु.खेडकर सुहानी ज्ञानदेव ही विद्यार्थिनी ८४.५०% गुण मिळवून विज्ञान शाखेतून प्रथम, जरे अमोल अशोक ७७.३३% गुण मिळवून द्वितीय तर कु.भराटे रूपाली भगवान हीचा ७६.८३% गुण मिळवून तृतीय क्रमांक आला आहे.विज्ञान शाखेतून ४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तर कला शाखेचा निकाल ९०.९०% लागला असून कला शाखेतून कु.इथापे प्रतिक्षा बापू ही विद्यार्थिनी ७१.८३% गुण मिळवून प्रथम,सापते पल्लवी नारायण ७१.६७% गुण मिळवून द्वितीय तर कु.बेदरे आरती अनिल हीने ६९% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.कला शाखेतून १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाच्या या नेत्रदीपक यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन ए.टी.पोकळे,संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे,सहायक विभागीय अधिकारी बी. एस. नाईकवाडी व पी.एम. तोरणे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य भास्कर पोकळे, मुरलीधर पवार,शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य आर बी बडे ,पर्यवेक्षक एफ एस जाधवर,सर्व स्कूल कमिटी सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य,श्री गहिनिनाथ वसतिगृह अधिक्षक व कर्मचारीवृंद तसेच विद्यालयाचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले.

## वैभवी देशमुख हिच्या बारावी परीक्षेतील यशाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन

मुंबई । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीने अत्यंत कठीण, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरं जात इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान शाखेतून ८५.३३ टक्के गूण मिळविल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिचे अभिनंदन केले आहे. वैभवीनं मिळविलेल्या यशानं तिच्या अंगभूत गुणांचं, हुशारीचं, धैर्याचं, संयमाचं, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन घडल्याचं सांगून तिच्या यशानं महाराष्ट्राला आनंद झाला आहे, अशा शब्दात त्यांनी तिचं कौतुक केलं आहे.**



वैभवी देशमुख हिला पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे की, ‘‘इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत विज्ञान शाखेत ८५.३३ टक्के गूण मिळवून तू उत्तीर्ण झाल्याचे समजून माझ्यासह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला आहे. वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मृत्यूनंतर अत्यंत दु:खद, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरं जात मिळवलेलं यश तूझ्या अंगभूत गुणांचं, हुशारीचं, धैर्याचं, संयमाचं, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन घडवणारं आहे. तूझ्या यशातून राज्यातील इतर विद्यार्थ्यांना लढण्याची, यशस्वी होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आहे. तूझ्या यशानं वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांना खुप आनंद झाला असता, ते आज आपल्यासोबत नसले तरी तितकाच आनंद महाराष्ट्र आज अनुभवत आहे. तुझ्या कष्टांना, जिद्दीला सलाम. यापुढेही शैक्षणिक कारकिर्दीत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर तूला असंच यश मिळत राहो, आम्ही सर्व कायमच तूझ्यासोबत आहोत,’’ असा विश्वास देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## शब्दवेधच्या प्रा. सुरेश पुरी लोकपत्रकारिता पुरस्कारासाठी अमर हबीब यांची निवड

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

शब्दवेध बुक हाऊस प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा.



सुरेश पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, ‘जनसंपर्कतज्ज्ञ प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता’ पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे पाहिले मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, (अंबाजोगाई) यांची निवड करण्यात आली आहे.

शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे.

अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार वितरणा दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता, मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनु हिल, संभाजीनगर येथे होणार आहे. पुरस्काराचे पहिलंच वर्ष असून यापुढेही लोकपत्रकारिता करणार्या पत्रकारांचा सन्मान करून या पुरस्काराचे मूल्य जपण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे शब्दवेधचे वैजनाथ वाघमारे यांनी सांगितले.

## अंबाजोगाईत वादळी वारे आणि गारांसह मुसळधार पाउस; वीज कोसळून तरुणाचा मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हवामान विभागाने सूचित केल्यानुसार सोमवारी सायंकाळी अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात वादळी वाऱ्यांसह गारपिटीचा जोरदार पाऊस झाला. यावेळी शहरालगत असलेल्या मगरवाडी येथे वीज कोसळून एका तरुणाचा मृत्यू झाला. सचिन मधुकर मगर (वय ३८, रा. मगरवाडी) असे मयत तरुणाचे नाव आहे.




सुमारे अर्धा तास पडलेल्या पावसामुळे अंबाजोगाईत शहरातील नाल्या ओसंडून वाहून रस्त्यांवर पाणी साचले. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे शहरवासीयांची चांगलीच धांदल उडाली. नागरिक दुकाने, टपऱ्या आणि इतर आडोशांखाली धाव घेताना दिसले. नेहमी प्रमाणेच पाऊस सुरू झाला की शहरातील बहुतांशी भागात वीजपुरवठाही खंडित झाल्याचे वृत्त आहे. गारपिटीमुळे परिसरातील शेतीसही फटका बसण्याची शक्यता आहे. शेतकरी वर्गात चिंता व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून मदतीचे आश्वासन द्यावे, अशी मागणी होत आहे.

## सार्थक घोडके सेन्टअँन्स स्कूलमध्ये पहिल्या दहामध्ये

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील शेतीनिष्ठ शेतकरी, अंकुर गूळ युनिटचे मालक, गावचे सरपंच तथा रोटरीचे सक्रिय सदस्य अजय घोडके यांचे चिरंजीव सार्थक अजय घोडके याने सेंट अँन्स स्कूलमध्ये ९१.५०% गुण घेऊन पहिल्या दहा मध्ये येण्याचा मान मिळवला. सार्थक घोडके याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



बीड तालुक्यातील लोळदगाव येथील ग्रामीण भागात राहून सार्थक अजय घोडके यांनी अथक परिश्रम घेऊन सेन्ट अँड स्कूलमध्ये पहिल्या दहा मध्ये येण्याचा मान मिळवला. त्याला ९१.५०% गुण मिळाले. या शाळेचे अकाश करवा, आर्यन फुटाणे, ज्ञानेश मुळे, श्रेयस काळे, अर्जुन सानप अब्दुल रहेमान, समर्थ बाहेती , मुग्धा सानप, स्वरूप लाड, यश तरकसे सार्थक घोडके, श्रद्धा पुंड, शिव उडान ,मयुरी जायभाये, शिराज क्षीरसागर ,आदित्य फुटाणे आदींनी घवघवीत यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सार्थक घोडके याचे मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांनी अभिनंदन केले.




# द्विस्तरीय साखर दरासाठी शुगर टास्क फोर्स करणार पाठपुरावा

**पुणे । प्रतिनिधी**

**साखरेला औद्योगिक व घरगुती असे द्विस्तरीय भाव देण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याबरोबरच गुजरातमधील साखर उद्योगाच्या उपपदार्थ प्रकल्पांची पाहणी करण्याचा निर्णय शुगर टास्क फोर्सने घेतला आहे.**

ऊसतोड कामगार, ऊस वाहतूक, यांत्रिक तोडणीतील समस्या व निवारण या विषयांवर टास्क फोर्सची बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली होती. साखर उद्योगातील तज्ज्ञ, कार्यकारी संचालक, शेतकरी नेते, अभ्यासक, शास्त्रज्ञ व ऊस तोडणी कामगार नेते या वेळी उपस्थित होते. श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ताराम रासकर यांनी टास्क फोर्सच्या कामाचा आढावा घेतला. टास्क फोर्स कोअर



कमिटीचे समन्वयक सतीश देशमुख यांनी, एक हार्वेस्टर किमान दोनशे ऊस तोडणी कामगारांचा रोजगार हिरावून घेत असल्याचे सांगितले. ''एका बाजूला मुकादमाचा ॲडव्हान्स चुकता करायचा व दुसरीकडे सावकाराच्या कर्जाचा तगादा या चक्रात कामगार अडकला आहे. हार्वेस्टर तंत्रज्ञानाला विरोध नाही. मात्र, ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योगातून रोजगार वाढला पाहिजे,'' असे ते म्हणाले. ऊस तोडणी मजुरांचे अभ्यासक सोमीनाथ घोळवे यांनी मजुरांचे विविध प्रश्न मांडले. ऊसतोड यंत्र उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी महेश सूळ यांनी यांत्रिकीकरणाचे फायदे व तोटे सांगितले. कृषी अर्थतज्ज्ञ डॉ. दीपक गायकवाड यांनी मध्यस्थ कमी करण्याची सूचना केली. ऊसतोड कामगार व मुकादम युनियनचे अध्यक्ष गहिनीनाथ थोरे पाटील यांनी यंत्रांद्वारे ऊस तोडणीचा पर्याय स्वीकारण्यास संमती दर्शविली. शेतकरी प्रतिनिधी रावसाहेब ऐतवडे यांनी ऊसतोडणी यंत्रामधील त्रुटींची माहिती दिली.

'आंदोलन अंकुश'चे दीपक पाटील यांनी, ऊस तोडणी व वाहतूक वजावटीमध्ये जास्त वाढ झाली आहे. त्याची आकारणी सरासरीप्रमाणे न करता अंतरानुसार टप्पानिहाय करण्यात यावी, अशी मागणी केली. चर्चेत कार्यकारी संचालक तात्यासाहेब निकम, इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजीचे संस्थापक अध्यक्ष अतुल माने पाटील, माजी कार्यकारी संचालक अनंत निकम, नंदकुमार सुतार, 'डीएसटीए'चे डॉ. दशरथ ठवाळ, सरव्यवस्थापक रोहिदास यादव व भारत तावरे, नवदीप सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव खामकर, शेतकरी अभ्यासक सीमा नरोडे, कारखाना कर्मचारी प्रतिनिधी दिलीप वारे, बाळ भिंगारकर, राहुल माने, संतोष पांगरकर, सुनील साळवे यांनीही भाग घेतला.




### महत्वाच्या घटना

१८४९ : जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.
१८७८ : पुण्यात पहिले मराठी ग्रंथकारांचे संमेलन म्हणजे आताचे साहित्य संमेलन भरविण्यात आले.
१९०७ : मुंबईमध्ये विजेच्या शक्तीवर चालणारी पहिली ट्रॅम सुरु झाली.
१९२८ : ब्रिटन देशातील मतदाराची वयोमर्यादा ही ३० वर्षावरून कमी करून २१ वर्ष करण्यात आली.
१९४० : विन्सटन चर्चिलन यांची ब्रिटनच्या पंतप्रधान पदी नियुक्ती करण्यात आली.
१९४६ : सोनी ह्या कंपनी ची स्थापना झाली.
१९५५ : एअर इंडिया ची मुंबई टोकियो विमानसेवा सुरू झाली.
१९७६ : होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.
१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.
१९९८ : मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.
२००० : व्लादिमीर पुतिन रशियाचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : नेपालचे तत्कालीन पंतप्रधान सूर्य बहादूर थापा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२००० : कोची येथे झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.
२०१२ : रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी तिसऱ्यांदा रशियाच्या राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९२ : युगोस्लाव्हिया सोशलिस्ट फेडरल रिपब्लिकचे माजी अध्यक्ष व क्रांतिकारक जोसेफ टिटो यांचा जन्मदिन.
१८६१ : पहिले भारतीय नोबेल पुरस्कार विजेते रबिंद्रनाथ ठाकूर तथा टागोर यांचा कलकत्ता येथे पिराली ब्राम्हण कुटुंबात जन्म. (मृत्यू: ७ ऑगस्ट १९४१)
१८८० : भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९७२)
१८९२ : क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष जोसेफ टिटो यांचा जन्म. (मृत्यू: ४ मे १९८०)
१९०९ : पोलरॉइड कॉर्पोरेशनचे संस्थापक एडविन एच. भूमी यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च १९९१)
१९१२ : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार पन्नालाल पटेल यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८९ अहमदाबाद, गुजरात)
१९२३ : आत्माराम भेंडे, मराठी अभिनेता, दिग्दर्शक, लेखक.
१९४८ : मैहर घराण्याचे बासरी वादक नित्यानंद हळदीपूर यांचा जन्म.
१९६९ : उत्तरप्रदेश राज्याचे उपमुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाचे सदस्य केशव प्रसाद मौर्य यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२४ : भारतीय कार्यकर्ते अलायरी सीताराम राजू यांचे निधन.
१९९१ : लोककवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे पुणे येथे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)
१९९४ : ध्रुपद गायक उस्ताद नसीर झहिरुद्दिन डागर यांचे निधन.
१९९९ : भारतीय महाराष्ट्रीयन मराठी कवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे निधन.
२००१ : लेखिका मालती बेडेकर ऊर्फ विभावरी शिरुरकर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १९०५)
२००१ : गीतकार, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रेम धवन यांचे निधन. (जन्म: १३ जून १९२३ अंबाला, पंजाब)
२००२ : दुर्गाबाई भागवत, मराठी लेखिका, लोक संस्कृती तसेच लोकसाहित्याच्या संशोधक, लेखन विचार स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या.

## शेणखत नसल्यास हिरवळीची खते देतात अधिक उत्पादन



जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म वाढवून सुपिकता टिकवण्यासाठी विविध पिकांना शेणखतांची शिफारस करण्यात आलेली आहे. परंतू शेतकऱ्यांकडे आज पुरेशा प्रमाणात व चांगल्या कुजलेल्या प्रतीच्या शेणखताची उपलब्धता होत नाही. त्यामुळे पूरक म्हणून हिरवळीची पिके घेतल्यास शेणखतांवरील खर्चात काही प्रमाणात बचत होऊ शकते. उदा. उसासाठी २५ टा प्रति हे. शेणखतांची शिफारस करण्यात आली आहे. म्हणजेच हेक्टरी कमीत कमी निरनिराळया विभागात पंचवीस हजार रूपये खर्च येतो, परंतू हिरवळीचे पीक (ताग किंवा धैंचा) घेतल्यास त्यावरील एकूण हेक्टरी खर्च आठ हजार रूपयांपर्यत येतो, म्हणजेच शेणखताची उपलब्धता कमी असल्यास आपण हिरवळीच्या खतांचे नियोजन काही प्रमाणात सेंद्रिय खतावरील खर्च कमी करू शकतो व सुपीकता टिकवू शकतो

**हिरवळीच्या खतांचे प्रकार :**

१) हिरवळीचे पीक शेतात गाडणे : यामध्ये हिरवळीच्या खताचे पीक शेतामध्ये वाढवून त्याच शेतामध्ये जमिनीत गाडतात. हिरवळीच्या खताचे स्वतंत्र पीक किंवा इतर पिकांबरोबर आंतरपीक म्हणू वाढवून त्याच शेतामध्ये गाडतात. यामध्ये प्रामुख्याने ताग, धैंचा, गवार, चवळी इत्यादी हिरवळीच्या पिकांचा समावेश होतो. २) हिरव्या पानांपासून खत तयार करणे : हिरवळीच्या खतांच्या या प्रकारामध्ये वनस्पतीची हिरवी पाने व कोवळया फांद्या, झुडपे, बांधावरील वनस्पती, पडिक जमिनीवर आणि जंगलातील वाढलेल्या झाडांची हिरवी पाने व कोवळ्या फांद्या गोळा करून जमिनीत गाडतात. शेवरी, गिरीपुष्प, सुबाभूळ इत्यादी वनस्पतींचा समावेश होतो.

**हिरवळीच्या पिकांची निवड :**

हिरवळीचे पीक कमी कालावधीत वाढणारे आणि भरपूर हिरवा पाला देणारे असावे. पिकांच्या फांद्या कोवळ्या आणि लुसलुशीत असाव्यात, म्हणजे कुजण्याची क्रिया लवकर होईल. पीक सुरुवातीच्या वाढीच्या काळात जलद वाढणारे असावे म्हणजे तणांचा प्रादुर्भाव कमी होईल. हिरवळीचे पीक द्विदल वर्गातील असावे, म्हणजे वातावरणातील नत्र स्थिर होण्यास मदत होते. पिकांची मुळे खोलवर जाणारी असावीत, जेणेकरुन जमिनीतील खालच्या थरातील अनद्रव्ये ही पिके शोषून घेतील. हिरवळीची पिके जमिीच्या प्रकारानुसार घेतल्यास वाढ चांगली होईल. उदा. क्षारयुक्त, चोपण जमिनीत धैंचासारखी पिके घ्यावीत. या जमिनीत इतर कडधान्ये, द्विदल वर्गातील हिरवळीची पिके घेऊ नये, कारण ती क्षारास संवेदनशील आहेत.

**हिरवळीच्या खतांसाठी पिके व पीक पध्दती :**

१) उहाळयात घेतली जाणारी पिके : लवकर वाढणारी ताग, धैंचा यासारखी पिके मे-जून महियात पेरून खरिप पीक घेण्याच्या अगोदर सर्वसाधारणपणे जुलै ऑगष्टमध्ये ती जमिनीत गाडावीत. २) मुख्य पिकांच्या ओळीमध्ये हिरवळीचे पीक घेणे: मुख्य पिकांच्या दोन ओळीमध्ये ही पीके एकाच वेळी आंतरपीक पध्दतीने घेतली जातात. उदा. भाताबरोबर ताग, बागायती कापूस व मका पिकांमध्ये ताग, चवळी, उडीद, मुग किंवा हरभरा, ऊसामध्ये आंतरपीक धैंचा किंवा ताग ही हिरवळीची पिके घेतली जातात ६ ते ८ आठवडयांनी ही पिके जमिनीत गाडावी लागतात. ३) मोकळया जमिनीत हिरवळीची पीके घ्यावीत. खरीप हंगामात ताग, चवळी अगर धैंचा किंवा भाजीपाला पीके घेतात. या पध्दतीमुळे एक हंगाम वाया जातो. ४) हिरवळीचे मुख्य पीक घेणे. क्षारयुक्त चोपण जमीा सुधारण्यासाठी या पध्दतीचा उपयोग होतो. वाळूयुक्त जमिनीत फेरपालट करण्यासाठी हे उपयुक्त ठरते.

**हिरवळीच्या पिकांचे फायदे :**

हिरवळीची पिके जमिनीत गाडल्यावर सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. त्यामुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची संख्या व वाढ चांगली होते आणि जैविक गुणधर्मांची सुधारणा होते. हिरवळीची पिके जमिनीच्या खालच्या थरातून अनद्रव्ये शोषून घेतात आणि ही पिके गाडल्याांतर अनद्रव्यांची उपलब्धता वरच्या थरात वाढते. हिरवळीची पिके द्विदलवर्गीय असल्यास हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण करण्यास मदत होते. उथळ/हलक्या जमिनीची जलधारणशक्ती वाढते आणि रासायिाक खतातील पाण्याद्वारे वाहून जाणाऱ्या अनद्रव्यांचा ऱ्हास कमी होतो. भारी काळया, खोल जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा चांगला होऊन वाफसा स्थिती लवकर येते. हिरवळीच्या खतामुळे कठीण घडण झालेल्या जमिनीची घडण सुधारते, तसेच घनता कमी होऊन हवा खेळती राहते. पावसाच्या पाण्यामुळे होणारी मातीची धुप जमिनीची सरंचना सुधारल्यामुळे कमी होते. क्षारयुक्त जमिनीतील विरघळणारे विद्राव्य क्षार निचरा सुधारल्यामुळे कमी होतात त्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. हिरवळीच्या पिकांची वाढ जोमदार व जलद असल्यामुळे त्यामध्ये तणे वाढू शकत नाहीत. धैंचासारखे हिरवळीचे पीक चोपण जमिनीत चांगल्या प्रकारे वाढत असल्याो चोपण जमिनी सुधारण्यासाठी जिप्समसारख्या भूसुधारकेबरोबर धैंचा पीक जमिनीत गाडावे. अशाप्रकारे जमिीची सुपिकता टिकविण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी दोन ते तीन वर्षांतून एकदा तरी हिरवळीचे पिके जमिनीत गाडावीत व त्याानुसार पिक पध्दतीमध्ये हिरवळींच्या पिकांचा अंतर्भाव करावा. यामुळे सेंद्रिय खतावरील खर्च कमी होऊन जमिनीत टाकलेल्या रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढेल, जमिीची जैविक सुपीकता वाढेल आणि शेती उत्पादन आर्थिकदृष्ट्या फायद्याचे होईल.

## भूजल पातळी वाढविणाऱ्या पाझर तलावाचे नियोजन

**पाणलोटक्षेत्रात वाहून जाणारे पाणी अडविले जाऊन शेतीकरिता व त्या क्षेत्रातील भूजल पुनर्भरणाकरिता त्याचा वापर होऊ शकतो. पाझर तलाव म्हणजे नैसर्गिक नाला किंवा ओढ्यावर आडवा बांधलेला आणि पाणलोटक्षेत्रातून गोळा होणारा प्रवाह अडवून तो जास्तीत जास्त दिवस साठवून, तो जमिनीत मुरवून त्या क्षेत्रातून भूजलाची पातळी वेगाने वाढविणाऱ्या बंधाऱ्यामुळे तयार होणारा जलाशय.**



पाझर तलावामुळे पाण्याबरोबर वाहून जाणारी सुपीक मातीदेखील अडविली जाते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी दुष्काळी प्रदेशात पाझर तलावाचे बांधकाम करतात. पाझर तलावाचे बांधकाम करताना अशा पद्धतीने करावे की, पावसाळ्यात तलाव संपूर्ण भरावा आणि हिवाळ्यापर्यंत सर्व पाणी पाझरून/ मुरून आजूबाजूच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते. ज्या ठिकाणी पाझर तलावाचे बांधकाम असते, त्या ठिकाणी जमिनीचा थर पाझरास योग्य असावा लागतो. पाझर तलावाचे मुख्य कार्य म्हणजे त्यामध्ये साठविलेले पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे. पाझर तलाव हा सच्छिद्र भूभागावर बांधला, तरच त्याचे फायदे मिळू शकतात. म्हणून पाझर तलाव हा एखाद्या भारी अथवा अभेद्य जमिनीवर बांधू नये, की ज्यामुळे पाझर तलावाच्या मुख्य कार्याला बाधा होईल. पाझर तलाव अशा ठिकाणी बांधावा, की तेथील जमिनीचा वरचा थर सच्छिद्र असेल आणि त्याखालच्या कमीत कमी तीन मीटर जाडीचा थर हा जास्तीत जास्त झिजलेला असेल. अशा प्रकारच्या जमिनीवर बांधलेल्या तलावामुळे भूजल पुनर्भरणाचा वेग वाढतो. पाझर तलावाच्या खालच्या बाजूला अथवा परिणाम क्षेत्रात पिकायोग्य जमीन मोठ्या प्रमाणात असणे आवश्यक आहे. अशी मोठ्या प्रमाणातील शेतजमीन असल्याने पाझर तलावाचा जास्तीत जास्त उपयोग करून शक्य होते. त्याचप्रमाणे या भागात अनेक विहिरी असणे किंवा नवीन विहिरी खोदण्यालायक क्षेत्र असणे गरजेचे आहे, की जेणेकरून त्या भागाला सिंचनाखाली आणणे सहजशक्य होईल. लहानात लहान पाझर तलावाच्या क्षेत्राची लांबी एक किमी असते. पाझर तलावामध्ये जास्त होणारे पाणी काढून टाकण्यासाठी सांडव्याची साधी, आर्थिकदृष्ट्या परवडणारी आणि कार्यक्षम व्यवस्था करता येणे भौगोलिकदृष्ट्या शक्य व्हावयास हवे.

ज्या पाणलोटक्षेत्रामधून पाझर तलावामध्ये पाणी येणार आहे, त्यात योग्य प्रमाणात झाडेझुडपे व गवत असावे, की ज्यामुळे मातीची धूप होणार नाही. जर अशा प्रकारची व्यवस्था नसेल, तर त्या पाणलोटक्षेत्रात मृद्संधारणाची कामे हाती घ्यावीत; अन्यथा ती वाहून आलेली माती पाझर तलावात साठून त्याची साठवणक्षमता कमी होऊ शकते. पाझर तलावाचा भराव तयार करण्याकरिता योग्य प्रकारची माती इतर बांधकाम साहित्य त्या क्षेत्रातच उपलब्ध होणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. बाहेरून साहित्य वाहून आणून भराव तयार करण्यामुळे खर्चात अनावश्यक वाढ होऊ शकते.

## भाजीपाला पिकांवरील करपा आणि भुरी रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन

करपा आणि भुरी रोग हे प्रामुख्याने वांगे, भेंडी, मिरची, टोमॅटो, कोबी, फुलकोबी, वेलवर्गीय पिके या सर्व भाजीपाला पिकांवर आढळतात. या रोगाचे एकात्मिक नियंत्रण जाणून घेऊ या.

**पानावरील करपा** : लवकर येणारा करपा - अल्टरनेरीया सोलॅनी नावाच्या बुरशीमुळे होतो. सुरवातीला जमिनीलगतच्या पानांवर लहान गोलाकार, तपकिरी ते काळपट रंगाचे ठिपके येतात. प्रादुर्भाव वाढून ठिपके एकमेकात मिसळून मोठ्या आकाराचे तपकिरी चट्टे पानावर तयार होतात. यामुळे पाने करपून गळतात. पानाप्रमाणे खोडावरदेखील गर्द तपकिरी वलयांकित डाग पडतात. त्यामुळे फांद्या कमकुवत होऊन मोडतात.

**उशिरा येणारा करपा** – फायटोप्थोरा इन्फेस्टन्स नावाच्या बुरशीमुळे पाने, खोड, फांद्या आणि हिरव्या आणि लाल फळांवर हा करपा आढळून येतो. सुरवातीला पानावर काळपट ते फिक्कट तपकिरी रंगाचे गोलाकार ठिपके दिसून येतात. ढगाळ हवामानात रोगाचा प्रादुर्भाव वाढून खोड,पाने आणि फळांवर पसरून पाने करपून गळतात. अती आर्द्र हवामानात पानाच्या वरती आणि डागाच्या कडेवर पांढरी बुरशीची वाढ होते.

**प्रतिबंधक उपाय** : जमिनीचा खोल नांगरट करावी. पिकाची फेरपालट





करावी, एकाच वर्गातील पिकांची लागवड करू नये. लागवडीसाठी रोगविरहित आणि प्रमाणित बियाण्यांचा वापर करावा. कार्बेन्डाझिम २.५ ते ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. वेलवर्गीय पिकाची लागवड मंडप अथवा ताटी पद्धतीने करावी, म्हणजे वेलीचा संपर्क जमिनीशी येणार नाही याची

**नियंत्रण उपाय** : मॅन्कोझेब २.५ ते ३ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराइड २.५ ते ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा टेब्यूकोनॅझोल १ मिली प्रति लिटर पाणी फवारणी करावी. उशिरा येणारा करपा रोगाच्या नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झिल + मॅन्कोझेब हे संयुक्त बुरशीनाशक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

**भुरी रोग** : हा रोग ईरिसीफी सिचोरासीयारम या बुरशीमुळे होतो. रोगाची सुरवात प्रथम जुन्या पानापासून होते. पानाच्या दोन्ही पृष्ठभागांवर पिठीसारखी पांढरी बुरशी वाढते. प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडून करपतात आणि वेली वाळतात. रोगाचा प्रादुर्भाव जास्त झाल्यास या बुरशीमुळे पाने भुरकट पडतात. हा रोग देठ, खोड आणि फळांवरही पसरतो. यामुळे वेलींची वाढ खुंटते.

**प्रतिबंधक उपाय** : भुरी रोगास सहनशील वाणांची निवड करावी. उदा. फुले शुभांगी (काकडी), फुले मुक्ता (मिरची) पीक लागवडीपूर्वी जमिनीतील अगोदरच्या पिकांचे अवशेष पूर्णपणे नष्ट करावे तसेच पिकांची फेरपालट करावी. पिकास पोटॅश अन्नद्रव्य कमी पडल्यास पीक भुरी रोगाला बळी पडते त्यामुळे सुरुवातीच्या काळापासून नत्रयुक्त खतांचा वापर संतुलित प्रमाणात करून पोटॅश आणि कॅल्शिअम युक्त खतांचा वापर वाढवावा जेणेकरून पीक भुरी आणि इतर रोगांना बळी पडणार नाही. प्लॉट मध्ये आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी शक्य असल्यास तुषार सिंचनाचा वापर करावा.

**जैविक नियंत्रण उपाय :**

अँपेलोमायसेस क्विस्कालिस ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन ते तीन वेळा पिकात फवारणी करावी.

अँपेलोमायसेस क्विस्कालिस ची बुरशी भुरी रोगाच्या बुरशीवर उपजीविका करते त्यामुळे रोग नियंत्रणास तसेच प्रतिबंधास मदत होते.

**रासायनिक नियंत्रण :**

भुरी रोगाची लक्षणे दिसताच, फवारणी प्रतिलिटर पाणी डिनोकॅप किंवा ट्रायडेमॉर्फ ०.५ ते १ ग्रॅम/ मिलि किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल २ मिलि प्रति लिटर पाणी फवारणी करावी. कोबी पिकासाठी विद्राव्य गंधक (८० टक्के) २.५ ग्रॅम किंवा डिनोकॅप १ मि.लि. प्रति लिटर पाणी फवारणी.

# टायरची चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेने उघड करुन दोन आरोपी केले



बीड । प्रतिनिधी

दि.१५/३/२०२५ रोजी ०६०० ते दि.१६/३/२०२५ रोजीचे ०९३० वा. पुर्वी बीड बायपास रोड लगत शिदोड शिवार ता.जि.बीड येथे फिर्यादी गणेश महादेव गायकवाड व्यवसाय गुत्तेदारी, रा. सुभाष कॉलनी पेठ बीड यांचे गॅरेज लाईन चे गाळया समोर उभे असलेल्या आमचे टाटा कंपनीचे दहा टायरी वाहनाचे आठ टायर्स ९६,०००/– व आठ डिक्स २४०००/– तसेच अखील खान यांचे त्या परिसरात असलेले दुकानासमोर ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे ०७ टायर १४०००/– रु असे दोन ठिकाणांवरील एकुण १,३४,०००/– रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला म्हणुन दिनांक १७/०३/२०२५ रोजी पो.स्टे. बीड ग्रामीण गुरनं ७९/२०२५ क.३०३(०२) भादंवि प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख यांनी अधिपत्याखालील पोउपनि श्री. महेश विघ्ने यांचे पथकास आरोपी शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले होते. पोउपनि महेश विघ्ने यांनी आपल्या पथकातील अंमलदारसह आरोपीची गोपनिय माहिती काढण्यास सुरुवात केली.दिनांक ०४/०५/२०२५ रोजी आरोपी शोध घेत असतांना गोपनिय माहिती द्वारे कळाले की इसम नामे पापा उर्फ रामेश्वर राजेंद्र शिंदे याने व त्याचे इतर साथीदाराने मिळुन सदर गुन्हा केला आहे. त्यानंतर पथकाने सदर इसमास इंद्रापेढी येथुन ताब्यात घेवुन गुन्हया अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर साथीदार रवी सुंदुर काळे रा.जोगेश्वरी पारधी पेढी,पारा, ता.वाशी,जि.बीड व इतर साथीदारांसह केला असल्याचे कबुली दिली असुन गुन्हयातील गेलामाल पैकी ६४,०००/– रु मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. नमुद दोन्ही आरोपीतांना पो.स्टे.बीड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन इतर चार आरोपींचा शोध घेवुन अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.बीड ग्रामीण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोह/तुषार गायकवाड, पोअं/बप्पासाहेब घोडके, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.

## थोडक्यात



### व्यापारी महासंघाच्यावतीने विवेक जॉन्सन यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीडचे नूतन जिल्हाधिकारी , विवेक जॉन्सन्स यांचा बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या कार्यकारिणी सदस्यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा बीड जिल्हा व्यापारी कार्यकारणीने सदिच्छा भेट व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापाऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविण्या साठी मी कायम शासनदरबारी तत्पर असेल व व्यापाऱ्याला प्रशासनाचे नेहमीच सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले . यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्कर जाधव , कार्याध्यक्ष अशोक शेटे , बीड शहर अध्यक्ष प्रकाश कानगावकर , सचिव सूर्यकांत महाजन , होलसेल किराणा अध्यक्ष जवाहरलाल कांकरिया , लइक अहमद , इ. व्यापारी बांधव उपस्थित होते .

### सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर महाविद्यालयाची निकालाची परंपरा कायम

वडवणी :– पिंपळनेर येथील सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालयाचे सतत १० वर्ष विज्ञान शाखेचा १००% निकाल या वर्षि हि निकालात मुलींनीच बाज़ी मारली. इयत्ता बारावी परिक्षेचा२०२४–२५चा निकाल विज्ञान शाखा १००% व कला शाखा १००%, विज्ञान शाखा विशेष प्राविण्यासह:–१३५ विद्यार्थी व प्रथम श्रेणी:–३४ विद्यार्थी पास विज्ञान शाखा एकुन विद्यार्थी:१६९ तर कला शाखा विशेष प्राविण्यासह:–२३ विद्यार्थी , प्रथम श्रेणी:–५८ विद्यार्थी व द्वितीय श्रेणी:–१ विद्यार्थी पास कला शाखा एकुण विद्यार्थी ८२ होते.विज्ञान शाखेतुन १)कु. पडदरिया तेजस्वी प्रदीप:–८९.५० % गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळवला. २)तर द्वितीय क्रमांकावर यादव साक्षी दत्ता व आव्हाड हर्षदा हेमंत यांनी:–८८.५० % गुण मिळविले व ३) तृतीय क्रमांक कु. पवार सई दीपक हिने:–८८.३३% गुण घेवुन मिळवला. कला शाखेतुन प्रथम कुलभैय्या सुवर्णमाला मनोहर:–८४.३३% , द्वितीय क्रमांक कु. गव्हाणे दुर्गा नवनाथ :–८२.५०% तर तृतीय क्रमांक कु. गायकवाड वैष्णवी बाबुराव:–८०.३३ % गुण घेवुन मिळवला. या यशा बद्दल संस्थेचे सचिव मा. आ. केशवरावजी आंधळे साहेब, अध्यक्ष श्री. राजाभाऊ वारे, उपाध्यक्ष श्री. संजयभाऊ आंधळे व संचालक श्री. रंजित भैय्या धस व इंजिनियर अशोक भैय्या आंधळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे कौतुक व अभिनंदन केले. तसेच प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### महाराणी ताराबाई विद्यालयाची बारावीच्या उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा इयत्ता १२ वी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल घोषित झाला असुन संस्कार शिक्षण मंडळ वडवणी, संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वी परीक्षेचा सरासरी निकाल ९७.१७ % लागला असून प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षाचा निकाल सोमवार दि.०५ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला.यामध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा ९९.३६ % तर कला शाखेचा ९३.४० % तर दोन्ही शाखेंचा एकूण सरासरी ९७.१७ % निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली असून विज्ञान शाखेतून कु.पायल भाऊसाहेब धाईतिडक ८४.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ८४.३३ % गुण घेऊन कु.प्रतीक्षा महादेव लोंढे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर चि.प्रतीक शिवाजी धाईतिडक यांनी ८३.८३% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे. तसेच कला शाखेतून चि.केशव महादेव हिरे यांनी ८३.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे.तर कु.तनुजा बालाजी राऊत हिने ८३.५० % गुण घेऊन द्वितीय क्रमांक आला आहे तर कु.दिव्या नरहरी डोंगरे व चि.ईश्वर बाळू घुगे या दोघांना ७९.३३% समान गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी , उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर, श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,एचएससी बोर्ड परीक्षेचे परिक्षा विभाग प्रमुख प्रा.कांबळे आर.आर., प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा.डाके सर,प्रा.केदार सर,प्रा.राठोड सर,प्रा.मुंडे बी.डी.,प्राध्यापिका कचरे मॅडम,प्राध्यापिका उघडे मॅडम,सावंत सर यांच्यासह विद्यालयातील सर्व प्राध्यापक ,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# जे. ई. एस. महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम



जालना । प्रतिनिधी

बारावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रमासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत येथील जे. ई. एस. महाविद्यालयातुन विज्ञान शाखेत ३०८ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी २९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विज्ञान शाखेचा निकाल ९४.८० टक्के लागला आहे. त्यापैकी ३२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.या महाविद्यालयाचे प्रथम श्रेणीत ८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि व्दितीय श्रेणीत १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात सर्वप्रथम कु. सेजल संजय कुलकर्णी हिला ५२९ गुण ८८.१७ टक्के, व्दितीय कु. अनुश्री अरविंद महाजन ५२० गुण ८७.६७ टक्के, तृतीय कु. साक्षी लक्ष्मण काटे ५२३ गुण ८७.१७ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. वाणिज्य शाखेत ३१३ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी २८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, वाणिज्य शाखेचा निकाल ९०.४१ टक्के लागला आहे. त्यापैकी ८६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि व्दितीय श्रेणीत ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण व टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. सर्व प्रथम अभिषचंद्र श्रेयांस हिरप याला ५७० गुण ९५ टक्के, व्दितीय कु. अक्षरा शैलेश चौधरी ५६८ गुण ९४.६७ टक्के व तृतीय कु. सिद्धी जयप्रकाश साबु ५६७ गुण ९४.५० टक्के प्राप्त झाले आहेत. कला शाखेत १२५ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, कल शाखेचा निकाल ५८.४० टक्के लागला आहे. त्यापैकी २ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि व्दितीय श्रेणीत ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

गुणानुक्रमे विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण व टक्केवारी पुढीला प्रमाणे आहे. सर्व प्रथम कु. वैष्णवी शिवाजी नन्नवरे हिला ४९६ गुण ८२.६७ टक्के, शेख अलिम सलिम ४५२ गुण ७५.३३ टक्के व तृतीय कु. प्रियंका पवन शर्मा ४३४ गुण ७२.३३ टक्के प्राप्त झाले आहेत.यशस्वी विद्यार्थ्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुष–त्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष

फुलचंद भक्कड, कोषाध्यक्ष हेमेंद्र लखोटिया, संचालक पन्नालाल बगडिया, प्राचार्य डॉ.गणेश अग्नीहोत्री, उपप्राचार्य पी. सी. बाफना, पर्यवेक्षक एस. बी. बिक्कड, पर्यवेक्षिका श्रीमती के. के. वासनिक तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## नाथ कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

नाथापूर । प्रतिनिधी

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालामध्ये याही वर्षी नाथ कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट अशी परंपरा कायम ठेवलेली आहे. विज्ञान शाखेमधून कुमारी उबाळे आरती अनिरुद्ध हीने ८९.५०% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर घोडके प्रतीक्षा शैलेश आणि कुटे सृष्टी संतोष या दोन्ही विद्यार्थिनींनी ८९.१७% गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळवला आहे तर तृतीय क्रमांक चि. आरसूळ शुभम बालप्रसाद, मुसळे वेदांत नवनाथ,काळे अनुष्का श्रीकिसण आणि शेख माहीन नसीर या चौघांनी प्रत्येकी ८८.५०% गुण प्राप्ती करत सामाईकपणे विज्ञान शाखेतुन महाविद्यालयातुन तिसरा क्रमांक मिळवला.

कला शाखेमधून सर्वप्रथम नेण्याचा मान पटकावला आहे आडागळे प्रियंका राजेंद्र हिने ८३.८३% गुण मिळवले तर द्वितीय क्रमांक पंडित प्रतीक्षा राजेंद्र हिने ८१.२३% गुण मिळवले तर आबुज पवन मोहन या विद्यार्थ्यांने ७९.०० मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेचा एकूण निकाल ९६.७३ % , विज्ञान शाखेचा एकुण निकाल ९९.५७ % तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचा एकुण निकाल ९८.७७ % लागला आहे.यावर्षी विज्ञान शाखेमधुन एकुण १८३ विद्यार्थ्यी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झालेले आहेत.सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष मदनराव भाऊ चव्हाण, सरपंच मयुरीताई सुंदरराव चव्हाण, उपसरपंच सतीश शिंदे, समस्त गावकरी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद चव्हाण सर, मुख्याध्यापक अशोक चव्हाण सर, मुख्याध्यापक धुरवडे सर आणि उपप्राचार्य गिराम सर यांनी अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बाजार समितीचे सचिव खंडागळे यांचा होलसेल किराणा असोसिएशनतर्फे सत्कार

जालना । प्रतिनिधी

जालना बाजार समितीचे सचिव मोहन राठोड हे सेवानिवृत्त झाले असून, नवे सचिव म्हणून अनिल खंडागळे यांच्या नियुक्तीबद्दल जालना होलसेल किराणा मार्केट असोसिएशनतर्फे त्यांचा आणि संपूर्ण स्टाफचा सोमवार दि. ५ मे रोजी मार्केट यार्डमध्ये सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पंच हे होते. अध्यक्षीय भाषणात सतीश पंच म्हणाले की, सेवानिवृत मोहन राठोड आणि त्यांच्या जागी नियुक्ती झालेले नूतन सचिव अनिल खंडागळे हे दोघेही खालून वरपर्यंत आलेले असून, खंडागळे यांच्याकडूनही चांगली कामे होतील, यात शंका नाही. एकट्याने सत्कार न स्वीकारता खंडागळे हे संपूर्ण स्टाफला घेऊन आल्याने प्रशासनाला सोबत घेऊन चालणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची प्रचिती आली आहे, असे प्रशंसोदगार त्यांनी काढले. होलसेल किराणा मार्केट यार्डमध्ये स्वच्छता, शौचालय आणि मुतारी, अखंडित वीज, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी विनंती सतीश पंच यांनी अनिल खंडागळे यांच्याकडे केली.

सत्काराला उत्तर देताना अनिल खंडागळे म्हणाले की, उपलब्ध सर्व समस्या शक्य तेवढ्या लवकर सोडविण्याला आपले प्राधान्य राहील. बाजार समितीचे सभापती तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या माध्यमातून मुतारी आणि शौचालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. टॅक्स, गाड्यांचे भाडे, वेळेवर विज बिल भरणा या समस्यांबाबत व्यापारी आणि बाजार समिती प्रशासन दोघे मिळून तोडगा काढू. जालना बाजार समिती ही मराठवाड्यातील क्रमांक एकची समिती असून, संप वगैरे प्रकार कधीच या ठिकाणी झाले नाहीत. होशील किराणा मार्केटची ट्युशन दिवस भरभराट होत असून, व्यापारी, आडतीया, हमाल, मापाडी सर्वजण समन्वयाने काम करतात. या माध्यमातून आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीला आणखी उंचीवर नेण्याला आपले प्राधान्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमाला सुनील रुणवाल, पुरुषोत्तम अग्रवाल, अनिल पंच, किशन भक्कड, पृथ्वीराज भुरेवाल, अनिल लोढा, गौतम श्रीश्रीमाल, कपिल चावला, विपुल गोसरानी, पियूष भक्कड, दत्तप्रसाद लोढा, रमेश अलीजार यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



### बाजार समितीला आणखी उंचीवर नेण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहूत

सचिव अनिल खंडागळे म्हणाले की, व्यापारी आणि प्रशासन यांचा समन्वयच बाजार समितीच्या यशाचं गमक आहे.सत्कार ही जबाबदारीची जाणीव करून देणारी गोष्ट आहे. मार्केट यार्डमधील प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने काम करू. व्यापारी, आडतीया, हमाल, मापाडी सर्वजण समन्वयाने काम करत असल्यामुळे येथे कधीच संप किंवा गोंधळाचे प्रकार झाले नाहीत. हेच आपलं बळ आहे. टॅक्स, भाडे, वीजबिल यांसारख्या प्रश्नांवर दोन्ही बाजूंनी संवादातून मार्ग काढू. मराठवाड्याची शान असलेली जालना कृषी उत्पन्न बाजार समिती आणखी उंचीवर नेण्यासाठी आपले पुरेपूर निरंतर प्रयत्न राहतील.



### प्रा.संपत पवार यांची राष्ट्रीय सेवा जिल्हासमन्वयकपदी निवड

अंबड । प्रतिनिधी

मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड येथील मराठी विभागात कार्यरत असलेले प्रा. संपत तुकाराम पवार यांची राष्ट्रीय सेवा योजनेच्या जिल्हासमन्वयकपदी नुकतीच विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाव्दारे निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद यांनी अभिनंदन केले यावेळी सहाय्यक शिक्षण उपसंचालक वाणी साहेब राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे यासह छत्रपती संभाजीनगर विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

आमचे पक्षकार श्री. १) गणेश राम क्षिरसागर २) जनार्धन राम क्षिरसागर रा. हनुमान नगर, एम.आय.डी.सी. बीड ता. जि. बीड यांचे मार्फत जाहीर प्रगटन देण्यात येते की, सर्व तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळवण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी मंगल बबनराव भोसले रा. बलभीम नगर, पेठ बीड ता.जि. बीड यांच्या मालकी व ताब्यातील र.डी.जि.प. बीड सब डी. बीड ता. व पं.स. बीड पैकी कसबे बीड तरफ बोबडे येथील नविन वाढीव नगर परिषद हद्दीचे आतील सर्वे नं. ५५ मधील मालकी व ताब्यातील प्लॉट ज्याची साईस पूर्व पश्चिम ५० फुट व दक्षिण उत्तर पश्चिम बाजु ४५ फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ २२५० चौरस फुट म्हणजेच २०९.११ चौ. मीटर आहे.

ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| पूर्वेस : | २० फुटाचा रस्ता |
| पश्चिमेस : | एम.आय.डी.सी. हद्द व गायरान |
| दक्षिणेस : | तुळशीदास पवार यांचा प्लॉट |
| उत्तरेस : | जमिन मालकाने विक्री केलेले प्लॉट |

वरील चतु:सिमे अंतर्गत येणारा वर्णनाचा प्लॉट आमचे पक्षकारांनी खरेदी करण्याचा ठराव केलेला. सदरील प्लॉट खरेदीखत करुन घेणार आहेत. सदर मिळकत निर्विवाद, कर्ज विरहीत, आरक्षण विरहीत, सरकारी, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज बोजा नाही, तसेच इतर कोणाचेही हक्क संबध नाहीत, तसेच सदरच्या मिळकती बाबत कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार आमच्या पक्षकारा व्यतिरिक्त कोणाशही केलेला नाही. अशी कबुली लिहून देणार यांनी आमच्या पक्षकारांना दिलेली आहे. तरी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील मिळकती बाबत कोणाचेही काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास १५ दिवसांचे आत जाहीर प्रगटन जाहीर झाल्यानंतर संपर्क साधावा, नसता कोणाचाही आक्षेप नाही असे समजून कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व नंतर कोणाचाही आक्षेप स्वीकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत :– अ‍ॅड. एस. के. कांबळे मो.न. ९८८१५६९७४८

जाहीर प्रगटन देणार जनार्दन १) गणेश राम क्षिरसागर २) जनार्धन राम क्षिरसागर मो.न. ९९२१३७४६३३

## जाहिरनामा

मा.श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६७३/२०२५

राजेंद्र व इतर वि. निरंक — विधीज्ञ – श्री. फटक व्ही. एस.

**मागणी:– बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार: १) राजेंद्र पि. बाबुराव जगदाळे, वयः ५० वर्षे, धंदाः शेती, रा. तांदळवाडी घाट ता. जि. बीड २) दादाराव पि. बाबुराव जगदाळे, वयः ४५ वर्षे, घंदाः शेती, रा. तांदळवाडी ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे बाबुराव पि. अप्पाराव जगदाळे, राहणार– मौजे तांदळवाडी घाट, ता. जि. बीड हे दिनांक २५/०५/२०२१ रोजी राहते घरी मौजे तांदळवाडी घाट ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताची पत्नी तसचे मयताचे आईवडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास मुलगी नाही. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे बाबुराव पि. अप्पाराव जगदाळे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत बाबुराव पि. अप्पाराव जगदाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२५ आहे.

आज दिनांक १७/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरीत क.लि.

आदेशावरून, स्वाक्षरीत अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७७३/२०२५ **अ‍ॅड .एस. आर. कुंभार**

अर्जदार : (१) विजया भ्र. दिलीप कुलकर्णी, वय–६७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. नवीन भाजी मंडी कॉर्नर, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड. (२) आनंद पि. दिलीप कुलकर्णी, वय–३५ वर्षे, धंदा–वकीली, रा. नवीन भाजी मंडी कॉर्नर, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार :–निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे दिलीप पि. भालचंद्र कुलकर्णी यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे दिलीप पि. भालचंद्र कुलकर्णी, रा. नवीन भाजी मंडी कॉर्नर, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड हे दिनांक २५/०१/२०२५ रोजी पेंटगन सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास अन्य कोणीही वारस नाहीत. मयताचे आई वडील खुप वर्षापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे इंतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही महणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक १०/०६/२०२५

आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

स्वाक्षरीत क.लि.

आदेशावरून, स्वाक्षरीत अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# दुःखाचा हुंदका गिळत वैभवीने गाठलं यशाचं शिखर - राजेसाहेब देशमुख

## वैभवी देशमुख हिच्या १२ वी परीक्षेतील यशाबद्दल राजेसाहेब देशमुख यांच्याकडून अभिनंदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने अत्यंत कठीण व आव्हानात्मक परिस्थितीला सामोरं जात इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान शाखेतून ८५.३३ टक्के गुण मिळविल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी तिचे मस्साजोग येथे जाऊन वैभवीचे अभिनंदन व कौतुक करून तिला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी मस्साजोग येथे जाऊन बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिचे शाल व पुष्पहार देवून अभिनंदन व कौतुक केले. यावेळी राजेसाहेब देशमुख यांच्यासोबत शिवसेना (उबाठा) चे मदनलाल परदेशी, अमर शिंदे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, ईश्वर शिंदे, बाळासाहेब देशमुख, किरण देशमुख, बप्पासाहेब देशमुख यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. वैभवी देशमुख हिने मिळविलेल्या सुयशाबद्दल आमच्या



प्रतिनिधीशी बोलताना राजेसाहेब देशमुख म्हणाले की, वैभवीनं मिळविलेल्या यशानं तिच्यातील हुशारीचं आणि जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन झाल्याचं सांगून तिच्या यशानं संपूर्ण बीड जिल्हा, मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला आहे, वैभवी ही लढवय्या बापाची लढवय्यी लेक आहे..! अशा गौरवपर शब्दांत देशमुख यांनी तिचं कौतुक केलं आहे. पुढे बोलताना देशमुख म्हणाले की, इयत्ता १२ वी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत विज्ञान शाखेत ८५.३३ टक्के गुण मिळवून वैभवी उत्तीर्ण झाली आहे. वडील दिवंगत संतोष देशमुख यांच्या मृत्यूनंतर वैभवी ही अत्यंत दुःखद, प्रतिकुल परिस्थितीला सामोरं गेली. न्यायाचा लढा देत तिने मिळवलेलं यश हे समाजातील इतर विद्यार्थ्यांना जिद्दीच्या बळावर लढण्याची आणि जिंकण्याची प्रेरणा देते. आज संतोष आण्णा हयात असते तर यांना ही खुप आनंद झाला असता, जरी ते आज आपल्यासोबत नसले तरी त्यांचे आशिर्वाद आणि प्रेरणा आपल्या सोबत आहे. दुःखाचा हुंदका गिळत वैभवीने घवघवीत यश मिळवलं, यशाचं शिखर गाठलं आहे. पाठीवर कौतुकाची थाप द्यायला जरी वडील नसले तरी आज संपूर्ण महाराष्ट्रच वैभवीच्या पाठीवर कौतुकाची थाप देतोय. वैभवीला डॉक्टर व्हायचे आहे. तिच्या दुरदृष्टी, संयम, कष्ट, अभ्यासू वृत्ती व जिद्दीला सलाम. यापुढेही आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिला हे यश असंच मिळत राहो, देशमुख कुटुंबीयांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत. असा विश्वास देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी वैभवीला तिच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


# कपिलधारवाडी येथील पाच दिवशीय किर्तन महोत्सवास प्रारंभ

### आज ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे यांची हरीकिर्तन सेवा



बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान पासून जवळ असलेले कपिलधारवाडी येथे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीच्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आज महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने तसेच विश्वनाथ आप्पा सलगर श्री क्षेत्र कपिलधार , दत्त उपासक श्री वैजनाथ महाराज शिंदे दत्त संस्थान बालाघाट यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभ हस्ते आज मंगळवार दि.६ मे २०२५ रोजी वैशाख शुद्ध ।।९।। पासून भव्यदिव्य सुरुवात झाली आहे. या पाच दिवसीय कीर्तन महोत्सवात आज बुधवार दि.७/५/२०२५ ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे विनोदाचार्य (बीडकर) यांची हरीकिर्तन सेवा होणार आहेत. तरी या कीर्तन महोत्सवामध्ये भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.



# योगेश्वरी शिक्षण संस्थेस सैनिकी शाळेसाठी केंद्रीय रक्षा मंत्रालयाची मंजुरी!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या व मराठवाड्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेस केंद्रीय रक्षा मंत्रालयाने सैनिकी शाळा सुरू करण्यास अधिकृत मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे अंबाजोगाई शहरात आणि संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



योगेश्वरी शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शिस्तप्रिय शिक्षणपद्धतीसाठी प्रसिद्ध आहे. संस्थेने महात्मा फुले वसतिगृहाशेजारी असलेल्या साडेतीन एकर जागेचा प्रस्ताव संरक्षण मंत्रालयास सादर केला होता. काही महिन्यांपूर्वी संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी या ठिकाणी भेट देऊन जागेची पाहणी करून गेले होते. या पाहणीच्या अनुषंगाने अखेर आज मंत्रालयाकडून मंजुरीचे पत्र संस्थेस प्राप्त झाले आहे.

केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडे मराठवाड्यातील तब्बल ७० शिक्षण संस्थांनी सैनिकी शाळा सुरू करण्यासाठी अर्ज केले होते. त्यातील काही निवडक संस्थांमध्ये योगेश्वरी शिक्षण संस्थेची निवड झाल्याने तिच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा पावती मिळाली आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल अंबाजोगाई शहरात आणि शैक्षणिक वर्तुळात समाधान व्यक्त केले जात आहे. अनेक मान्यवरांनी संस्थेचे अभिनंदन करत सैनिकी शाळेमुळे नव्या पिढीला राष्ट्रीय सुरक्षेविषयीची जाणीव आणि सुसंस्कारित शिक्षण मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# जोधाप्रसादजी मोदी कनिष्ठ महाविद्यालयाची १२ वीच्या निकालाची यशस्वी परंपरा कायम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८ टक्के लागला असुन संयुक्त शाखेचा निकाल ५९ टक्के लागला आहे. १२ वी विज्ञान शाखेतुन प्रथम क्रमांक चि.वेदांत सुजित दीक्षित याने पटकावला. तसेच द्वितीय क्रमांक चि.अक्षय राजाभाऊ गवळी तर तृतीय क्रमांक चि.तुषार रामेश्वर माले याने पटकावला. संयुक्त शाखेत अनुक्रमे चि .अफजल रनु परसुवाले याने प्रथम, कु .रेणुका सुनील माने द्वितीय तसेच कु. राजकन्या बाबुराव हुशारे या विद्यार्थिनीस तृतीय क्रमांक मिळाला आहे. या यशाबद्दल मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी ,कार्यकारी संचालक संकेत मोदी,अध्यक्ष भुषण मोदी, संचालक सुरेश मोदी, मार्गदर्शक प्रा. वसंत चव्हाण , मा प्राचार्य दामोदर थोरात , मुख्याध्यापक तथा प्राचार्य विनायक मुंजे यांच्यासह माध्यमिक तथा उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# प्राप्त तक्रारींवरुन बोगस डॉक्टर्सची यादी तयार करा–जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

जिल्हयात बोगस डॉक्टर संदर्भाने आलेल्या तक्रारीनुसार संशयित डॉक्टर्सची यादी तयार करुन त्यावर वेळोवेळी तपासणी करुन याबाबत कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले.

जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची त्रैमासिक सभा आज झाली यात त्यांनी आतापर्यंतच्या कार्यवाहीचा आढावा घेतला. गेल्या ९ महिन्यात तालुकास्तरीय तपासणी पथकाने ३ ठिकाणी तपासणी केली मात्र असे डॉक्टर त्या ठिकाणी आढळून आले नाहीत असे सांगण्यात आले.

नागरिकांना आवाहन

आपल्या गावात कोणी बोगसपणे वैद्यकीय व्यवसाय करीत असेल तर नागरिकांनी आपापल्या भागातील तालुका आरोग्य अधिका–याकडे तक्रार द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी नागरिकांना केले आहे. तालुक्यासह गावपातळीवर ए.एन.एम. तसेच आशा वर्कर यांच्या माध्यमातून लक्ष ठेवण्याची आणि माहिती मिळवण्याची सुरुवात करा असे निर्देश त्यांनी जिल्हा आरोग्य अधिका–यांना दिले. आतापर्यंत आलेल्या तक्रारींचा पाठपुरावा करण्यासाठी तालुकास्तरावरील अधिका–यांना सांगण्यात यावे जेणेकरुन अशा बोगस डॉक्टर्सवर गुन्हे दाखल करता येतील असेही जिल्हाधिकारी म्हणाले. बैठकीस समितीचे सदस्य सचिव प्र. पोलीस अधिक्षक उमाशंकर कस्तुरे तसेच सर्व समिती सदस्यांची उपस्थिती होती.

# माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दिंद्रुड येथील बारावीचा १०० टक्के निकाल



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सन २०२४-२५ चा बारावी चा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये विद्यालयातील एकूण ३१२ विद्यार्थी परिक्षेला बसले होते यामध्ये विज्ञान शाखेत एकूण विद्यार्थी२३५ परिक्षेला बसले होते यामध्ये विज्ञान शाखेतून सर्व प्रथम क्रमांक.कु मते वेदीका रघुनाथ ९०.६७% , द्वितीय कु.शिरसे प्रतिभा चंदकांत ८९.६७% ,तूतीय चि. गव्हाणे प्रतिक अरुण ८८.८३% , कु.साळुंखे साक्षी कैलास ८८.१७% कला शाखेत एकूण ७७ विद्यार्थी बसले होते यामध्ये प्रथम क्रमांक कु .मुंडे गीता मधुकर ७०.००%,द्वितीय चि.मायकर अजिंक्य गणेश ६९.००% ,तुतीय कु.मुंडे निकीता सुधाकर ६७.६७%, चि.कांदे गणेश आबासाहेब ६७.३३%,मिळून ७५ टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी प्रविण ११९ आले असून या सर्व सर्व विद्यार्थ्यांचे सिंदफना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण, सचिव प्रतापभैय्या रांजवण, विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक जी. व्ही. उजगरे, पर्यवेक्षक पी. जी. लखमावाड आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

# यशवंत विद्यालयाच्या मीरा लांडगे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील यशवंत विद्यालयात कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी प्रिय शिक्षिका श्रीमती मीरा बबनराव लांडगे मॅडम यांना या वर्षीचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला होता. रविवार दिनांक ४ मे रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते सदरील पुरस्कार देऊन श्रीमती लांडगे मॅडम यांना सन्मानित करण्यात आले. सदरील आदर्श राज्यस्तरीय आदर्श शिक्षक



सर्व स्तरातून होतोय अभिनंदनचा वर्षाव!

पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती मीरा लांडगे मॅडम यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने मागील १७ वर्षापासून संविधान दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणीजणांचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने ''पद्मपाणि'' राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. या वर्षीच्या दिल्या जाणाऱ्या विविध राज्य राष्ट्रीय पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील

विविध क्षेत्रातील गुणवंत आणि कर्तुत्ववान गुणीजणांची निवड करण्यात आली

होती. यामध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी बीड शहरातील यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थी ◀◀ पान ३ वर

# ओ.बी.सी पालकांनो सावधान,शैक्षणिक नुकसान होऊ नये

## सर्वधर्मिय ओ.बी.सी.संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

आज ६ मे २०२५ रोजी हिंदू मुस्लिम ओबीसी- भटके विमुक्त संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव आणि शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देण्यात आले आहे, निवेदनात म्हंटले आहे की हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील




अनेक समस्या प्रलंबित आहे जसे की क्रिमिलीयर ची अट रद्द करणे, पदोन्नतीतील आरक्षण पूर्ववत करणे, बार्टी, मार्टी,सारथी, महाज्योती संस्थे प्रमाणे वनार्टी संस्थेला भरीव निधी देणे, विशेष म्हणजे आता बारावीची निट, मेडिकल, सी.ईटी. इत्यादी परिक्षा झाल्या असून आता त्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे, अनेक विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे प्रलंबित आहेत यासाठी सक्षम अधिकारी यांनी तातडीने आणि तात्काळ हिंदू मुस्लिमांतील पोटजातीचे तसेच ख्रिश्चन बौद्ध व इतर सर्व ओबीसी समाजातील जात वैधता ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड

बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.**



शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जान असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या दीड दशकापासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यात १ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे आरटीई अंतर्गत प्रवेश निश्चित

## बोगस प्रवेश रोखण्यात शिक्षण विभाग सपशेल अपयशी – मनोज जाधव

बीड । प्रतिनिधी

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी इंग्रजी शाळांतील २५ टक्के राखीव मोफत जागांवरील आरटीई प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या प्रतीक्षा यादीतील तिसऱ्या फेरीतील प्रवेशाची मुदत अखेर दि.७ मे रोजी संपुष्टात येणार आहे. आत्तापर्यंत जिल्ह्यात १ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे आरटीईद्वारे प्रवेश निश्चित झाले आहेत. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते दत्ता आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.**

आरटीई प्रवेशासाठी यंदा जिल्ह्यात २१४ शाळांमध्ये २ हजार २३५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ५ हजार ७८१ अर्ज दाखल झाले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे २ हजार १८३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर ६ मे पर्यंत १ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून



राबविण्यात येणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी साधारण चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. आता चौथी फेरी ही अंतिम असणार असून यात प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाणार आहे.

बोगस प्रवेश रोखण्यात शिक्षण विभाग सपशेल अपयशी – मनोज जाधव

आरटीई अंतर्गत प्रवेश मिळावा यासाठी अनेक पालकांनी खोटी कागदपत्रे तयार करत मोफत प्रवेशांचा लाभ मिळवला आहे. या संदर्भात सक्षम पुरावे आढळले असून रीतसर लेखी तक्रार जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालयास आपण दि. २७ फेब्रुवारी रोजी दिली होती या अनुषंगाने शिक्षणाधिकारी यांनी २८ फेब्रुवारी रोजी सदर तक्रारीच्या संदर्भाने गटशिक्षणाधिकारी यांना सखोल चौकशी करून आणि पडताळणी करून एकही बोगस प्रवेश होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि लेखी अहवाल कार्यालयास सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानंतर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने ७ मार्च रोजी त्री सदस्य चौकशी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# चार वाजता भोंगे वाजणार, घाबरून जाऊ नये - जिल्हाधिकाऱ्यांचे पुणेकरांना आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

**युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सायंकाळी चार वाजता पुणे जिल्ह्यात तीन ठिकाणी मॉकड्रिल घेण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान हे मॉकड्रिल केवळ खबरदारीचा उपाय म्हणून होत असून, यावेळी जे भोंगे वाजतील त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये. असे आवाहन ही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.**



पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कारवाईचे मोठे संकेत दिले आहेत. सध्या भारत पाकिस्तान युद्धाची जोरदार चर्चा सर्वत्र आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सूचनेनुसार देशात २४४ ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून किंबहुना युद्ध झाल्यास काय खबरदारी घ्यावी यासाठी हे मॉकड्रिल केले जात आहे.

केंद्र शासनाच्याच्या सूचनेनुसार राज्य शासनाने या मॉकड्रिलच्या तयारीसाठी बैठक घेतली. या बैठकीत महाराष्ट्रात पुणे, ठाणे, रत्नागिरी, मुंबई व सिंधुदुर्ग येथे मॉकड्रिल घेण्यात येणार आहे. पुणे शहरात विधान भवन येथे व जिल्ह्यात तळेगाव नगरपरिषद व मुळशी पंचायत समिती येथे हे मॉकड्रिल सायंकाळी चार वाजता होईल. यामध्ये लष्कर, पोलीस, एअर फोर्स, अग्निशामक दल, आरोग्य यंत्रणा, महसूल विभाग, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी कॅडेट आदी यंत्रणा सहभागी होणार आहेत.

युद्ध झाल्यास जर देशात कुठेही लष्करी हल्ला झाला तर, कमीत कमी कालावधीत मदत कार्य कसे पोहोचवता येईल व उद्भवलेल्या आपत्तीमध्ये सर्वसामान्यांना कसे संकट मुक्त करता येईल यासाठी हे मॉकड्रिल होत आहे. या मॉकड्रिलमध्ये केवळ मदतकार्य, काय खबरदारी घ्यावी याबाबत सराव होणार आहे. युद्धच्या वेळी अनेकदा मोठ्या शहरामधील महत्वाच्या इमारती व शासकीय कार्यालये लक्ष होतात. त्यामुळे मॉकड्रिलसाठी शहरात विधानभवन निवडण्यात आले आहे.

### मॉकड्रिलवेळी शहरात ब्लॅकआऊट नाही

पुणे शहरात सायंकाळी चार वाजता मॉकड्रिल होणार असून, यावेळी कुठेही ब्लॅकआऊट म्हणजेच लाईट घालवली जाणार नसल्याची माहिती जिल्हाधिकारी डुडी यांनी दिली. मॉकड्रिलवेळी बचत कार्य, रेसक्यू ऑपरेशनचा सराव घेतला जाणार आहे. लष्करी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार व सूचनेनुसारच हे मॉकड्रिल पार पडणार आहे मॉकड्रिलसाठी तीन तासाचा वेळ दिला असला तरी मदत कार्य हे लवकरात लवकर कसे करता येईल हे पाहून एक ते दीड तासात हे सर्व मॉकड्रिल संपन्न होईल. शहरांमध्ये सध्या ७६ ठिकाणी सायरन म्हणजेच भोंगे आहेत. १९६५ च्या युद्धामध्ये हे बसवण्यात आले होते त्यावेळी ते वाजवले गेले होते. मात्र उद्या होणाऱ्या मॉकड्रिल वेळी केवळ तीन ठिकाणी म्हणजेच विधान भवन, मुळशी पंचायत समिती व तळेगाव नगरपरिषद येथे सायरन वाजणार आहे.

# जुन्या भांडणातून लोखंडी रॉड मारून केला खून; एकाला जन्मठेप

**पुणे । प्रतिनिधी**

**जुन्या भांडणाच्या कारणावरून झोपलेल्या तरूणाच्या डोक्यात मशिनचा जड लोखंडी रॉड मारून खून करणाऱ्याला जन्मठेप आणि २० हजार रुपये दंडाची शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी.पी.क्षीरसागर यांनी सुनावली. दंड न भरल्यास**



**आरोपीला १ महिना अतिरिक्त करावास भोगावा लागेल. तर दंड भरल्यास ती रक्कम मयताच्या आईला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.**

सुरज सुनील फाळके (वय २७, रा. लक्ष्मीनगर, कोंढवा) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. अमोल सुरज खडके (वय २२, रा. लक्ष्मीनगर, कोंढवा) याच्या खून प्रकरणी त्याच्या आईने कोंढवा पोलिसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील राजेश कावेडीया यांनी काम पाहिले. तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक संदीप मधाळे आणि उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे यांनी या प्रकरणाचा तपास केला.

न्यायालयीन कामकाजासाठी पैरवी अधिकारी सहायक उपनिरीक्षक महेश जगताप व हवालदार विजय माने यांनी मदत केली. ही घटना कोंढवा येथील एका कंपनीत २६ ऑक्टोबर २०२१ रोजी घडली. फाळके आणि खडके कोंढवा भागातील एकाच कंपनीत कामाला होते. खडके यानेच फाळके याला कामाला लावले होते.मात्र, फाळके सतत कामाला दांड्या मारायचा. याबाबत खडके याला मालकाला सांगून कामावरून काढून टाकेन, अशी धमकी दिली होत. काही काळासाठी कामावरून काढूनही टाकले होते. याचा राग मनात धरून हे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. आरोपीला अधिकाधिक शिक्षा देण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील राजेश कावेडीया यांनी केली. ही मागणी ग्राह्य धरत न्यायालयाने निकाल दिला.

# दक्षिण पुण्यातील पाणीकपात अखेर रद्द!

**पुणे । प्रतिनिधी**

**धरणात पुरेसा पाणीसाठा असताना देखील दक्षिण पुण्यात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाणीकपातीचा निर्णय घेत दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयावर नागरिकांनी, विविध राजकीय व सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त करत विरोध केला होता. याबाबत पालिका आयुक्तांनाही धारवेर धरण्यात आले होते. फक्त दक्षिण पुण्यावरच अन्याय का, असा सवाल त्यांनी केला होता. यानंतर अखेर पाणीपुरवठा विभागाला जाग आली असून, दक्षिण पुण्याची पाणीकपात रद्द करण्यात आली आहे.**



दक्षिण पुण्यावर आठवड्यातून एक दिवस लादण्यात आलेली पाणीकपात पालिकेने मंगळवारी (दि. ६) मागे घेतली आहे. बुधवारपासून या परिसरात नियमित पाणीपुरवठा केला जाणार आहे. पाणीकपातीला नागरिकांकडून व राजकीय नेत्यांकडून होत असलेल्या विरोधामुळे ही पाणीकपात रद्द करण्यात आली आहे. परिस्थितीचा आढावा घेऊन पाणीकपात तत्काळ रद्द करण्याचे आदेश आयुक्तांनी पाणीपुरवठा विभागाला दिले आहेत.

पाण्याची मागणी वाढल्याने वडगाव जलशुद्धीकरण केंद्राची पाणी शुद्ध करण्याची क्षमता कमी असल्याने सिंहगड रस्ता व सातारा रस्त्यावरील भागात पाणीकपातीचा निर्णय घेत चक्राकार पद्धतीने आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. या निर्णयाची सोमवारपासून अंमलबजावणी करण्यात आली होती.

धायरी, सनसिटी, वडगाव बुद्रुक, हिंगणे, सहकारनगर, धनकवडी, बालाजीनगर, आंबेगाव पठार, दत्तनगर, संतोषनगर, भारती विद्यापीठ परिसर, आगम मंदिर, कात्रज, कोंढवा बुद्रुक आदी परिसरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात होता. धरणात पुरेसा पाणीसाठा असतानाही केवळ नियोजनाचा अभाव व वितरणातील त्रुटींमुळे दक्षिण पुण्यात पाणीकपात लागू केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यामुळे आमच्यावरच अन्याय का, असे म्हणत या निर्णयाला नागरिकांनी विरोध केला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना व भारतीय जनता पक्षाचे आमदार भीमराव तापकीर यांनीही ही पाणीकपात रद्द केली जावी, अशी मागणी केली होती. अखेर आज ही पाणीकपात रद्द करण्यात आली.

# महाविद्यालयीन तरुणाला धमकावून पैसे मागणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन

**पुणे । प्रतिनिधी**

**मैत्रिणीसोबत गप्पा मारत थांबलेल्या महाविद्यालयीन तरुणास गुन्हा दाखल करण्याची धमकी देत त्याच्याकडे ५० हजार रूपयांची मागणी करणाऱ्या येरवडा पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दोन्ही पोलिसांच्या निलंबनाचे आदेश दिले.**

पोलिस कर्मचारी दयानंद शिवाजी कदम, अश्विन ईश्वर देठे अशी निलंबित केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. २४ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता येरवडा येथील कॉमर्स झोन कंपनीजवळील रस्त्याच्याकडेला महाविद्यालयीन तरुण त्याच्या मैत्रीणीसमवेत गप्पा मारत थांबले होते.

त्यावेळी गस्तीवर असणारे पोलिस कर्मचारी देठे व कदम तेथे आले. त्यांनी तरुणावर कारमध्ये अश्लील कृत्य करत असल्याचा आरोप करुन गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. तसेच गुन्हा दाखल न करण्यासाठी त्याच्याकडे ५० हजार रुपयांची मागणी केली.


या प्रकारामुळे संबंधित तरुण मोठ्या प्रमाणात घाबरल्याने तो येरवडा येथील एका डॉक्टरांकडे गेला. त्यानंतर त्याने याप्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. दरम्यान, संबंधित प्रकरण पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे गेले, त्यांनीही याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले होते.




संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी याबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवून दिला होता. त्यानंतर पोलिस उपायुक्त जाधव यांनी दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांची चौकशी केली. त्यांचे वर्तन बेशिस्त, अशोभनीय व बेजाबदारपणाचे आहे. त्यांच्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन होत असल्याचा ठपका ठेवत कदम व देठे या दोन्ही पोलिसांना निलंबित केल्याचा आदेश जाधव यांनी दिला. दरम्यान, संबंधित प्रकरणात पोलिस कर्मचारी दोषी आढळले आहेत. त्यांना निलंबित करून याप्रकरणाची सखोल चौकशीची जबाबदारी लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांच्यावर सोपविली आहे.' असे जाधव यांनी सांगितले.

# लग्न सोहळ्यात आग्या मोहोळाच्या मधमाशांचा हल्ला; वऱ्हाडी जखमी

जुन्नर - जुन्नरच्या आदिवासी भागातील खडकुंबे येथील शुभविवाह सोहळ्यात आग्या मोहोळाच्या मधमाशांनी आज मंगळवार ता.०६ रोजी दुपारी हल्ला केला. या हल्ल्यात वऱ्हाडी मंडळी तसेच वधू वरांना



शुभाशीर्वाद देणारे पुढारी देखील सापडले.

मोहोळाच्या मधमाशांनी अचानक केलेल्या हल्ल्याने वधू वरासह वऱ्हाडी मंडळींची मोठी पळापळ झाली. ह्या घटनेने विवाह विधी देखील घाईगडबडीत आटोपता घ्यावा लागला.

खडकुंबे येथील दिक्षा आणि धनंजय यांचा शुभविवाह अनपेक्षित विघ्नामुळे चांगलाच गाजला. दुपारच्या सुमारास मंगलाष्टका सुरू असताना अचानक एका मोठ्या आग्या मोहोळावरील मधमाशांनी हल्ला केल्याने एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत अनेक वऱ्हाडी जखमी झाले असून त्यांना तातडीने जुन्नर येथील छत्रपती ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.खडकुंबे येथील गारे यांच्यासमोर दिक्षा व धनंजय (तेजस) यांचा विवाह मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात सुरू होता. दोन्हीकडील नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीने परिसर आनंदाने भरलेला होता. मात्र, दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास मंगलाष्टकांना सुरुवात झाली आणि मधमाशा गुंजारव करत मांडवात शिरल्याने एकच धांदल उडाली.

वऱ्हाडी बचावासाठी घाबरून इकडे तिकडे धावू लागले. माशांनी अनेक जणांना चावा घेतला. महिला, पुरुष आणि लहान मुले भेदरून ओरडत होती. सर्वत्र एकच गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.


या घटनेत जखमी झालेल्यांना तातडीने उपचारासाठी जुन्नरच्या छत्रपती ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मधमाशांच्या दंशाने अनेक जणांना सूज आली आहे. काही जणांना अधिक गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे, माजी पंचायत समिती सदस्य काळू शेळकंदे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता बोऱ्हाडे, तसेच नामदेव सरोगदे, रामदास करवंदे, भीमा भवारी आदी अनेक जण जखमी झाले आहेत. भूषण करवंदे याला मंचर रुग्णालयात दाखल केले आहे.

# पुण्यात दुचाकीवरील मृतदेहाचं गूढ उलगडलं! बापाची पैशाची मागणी, सूनेचा विरोध, कडाक्याचं भांडण अन् जीवन संपवण्याचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात घरगुती वादातून पतीनेच आपल्या आठ वर्षाच्या मुलासमोरच आपल्या पत्नीचा गळा दाबून हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. पत्नीला निर्घृणपणे संपवून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी जाताना त्याला पोलिसांनी पकडलं. त्यावेळी त्याने उडवा उडवीची उत्तर दिली. मात्र,पोलिसांना संशय आला त्यांनी त्याला घेऊन त्याचं घर गाठलं. घरी त्याच्या आठ वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या डोळ्यांनी आपल्या बापाने आपल्या आईला जीवे मारल्याची डोळ्यांनी पाहिलेली हकीकत सांगितली. ही मन हेलावून टाकणारी घटना पुण्यातील नांदेड सिटी जवळ ही घटना घडली आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती पुण्याचे पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा घटनाक्रम सांगताना पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल म्हणाले की, 'काल नांदेड सिटी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे. लायगुडे मळा परिसरातील समृध्दी सोसायटीत हे जोडपं गेल्या दीड वर्षांपासून राहत होतं. आरोपी राकेशनं राहत्या घरात बबीताची हत्या केली. दोघेही मूळचे उत्तर प्रदेश येथील रहिवासी आहेत. दीड वर्षापासून ते पुण्यामध्ये राहायला आलेले होते. घटना घडली त्या दिवशी दोघांमध्ये घरगुती



कारणावरून वाद झाला होता. सोमवारी रात्री आरोपी राकेशच्या वडिलांचा फोन आला होता. त्यांनी फोनवरून मुलगा राकेशकडे पैसे मागितले, मात्र, पत्नी बबीताने राकेशच्या वडिलांना पैसे देण्यासाठी नकार दिला. यावरून दोघांमध्ये वाद झाला. या नवरा-बायकोच्या वादानंतर बबिताने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिचा प्रयत्न फसला. मात्र, यानंतर संतापलेल्या राकेशनं बबीताची हत्या केली.

मिळालेल्या माहितीनुसार, राकेशने बबीताचा गळा दाबून तीचा जीव घेतला. त्यानंतर पत्नीचा मृतदेह कापडात गुंडाळला आणि विल्हेवाट लावण्यासाठी दुचाकीवरून घेऊन निघाला. मात्र, पत्नीच्या मृतदेहाचा विल्हेवाट लावायला जाताना काहींनी त्याला पाहिलं, त्यांनी पोलिसांना काहीतरी संशयास्पद सुरू असल्याची माहिती दिली. पोलिसांनी राकेशला रंगेहात पकडलं आणि त्यानंतर चौकशी केली. त्याने पोलिसांना उडवा उडवीची उत्तर दिली. मात्र, आठ वर्षाच्या मुलाजवळ चौकशी केली असता पतीचं सगळं पितळ उघड पडलं. पुण्यातील नांदेड सिटी जवळ ही घटना घडली आहे. राकेश राम नाईक निसार असं आरोपीचे नाव आहे, तर बबीता निसार असं पत्नीचे नाव आहे.

आंबेगाव आणि भारती विद्यापीठ पोलिसांनी राकेश निसार याला पकडलं आणि सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली. मध्यरात्री रात्री एक वाजताच्या सुमारास स्वामीनारायण मंदिर समोरून भुमकर पूलाजवळ नागरिकांना एक व्यक्ती संशयितरित्या गाडीवरून काहीतरी घेऊन जात असल्याचं पाहिलं आणि त्यानंतर त्या स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. यावेळी भुमकर पुलाजवळ बीट मार्शल पोहोचले आणि त्याला पकडलं असता त्याने गाडी सोडून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, बीट मार्शलने या राकेशला पकडलं आणि त्यावेळी राकेश कडे चौकशी करायला सुरुवात केली.

मृतदेह कोणाचा आहे? कुठून आला आहे ? तू कुठे घेऊन चाललाय? या सगळ्याची चौकशी करत असताना राकेशने उडवाउडवीची उत्तर दिली. मित्रांने हा मृतदेह मागवला आहे, त्याला खेडशिवापूर जवळ नेऊन देतो असं त्याने सांगितलं. मृत पत्नीने फाशी घेतली असल्याचंही त्याने आधी पोलिसांना सांगितलं. मात्र, पोलिसांना पुन्हा संशय बळावला आणि त्याच्याकडे पुन्हा विचारणा सुरू केली. नंतर पोलिसांनी थेट राकेशला घेऊन त्याचं धायरीतलं घर गाठलं, तेव्हा राकेश आणि बबिता यांचा आठ वर्षाचा मुलगा घरी झोपलेला दिसला. पोलिसांनी मुलाकडे चौकशी केली असता मुलांनी थेट पोलिसांना वडिलांनीच आईला मारून टाकल्याचं सांगितलं. आई आणि वडिलांमध्ये जेवणाच्या कारणावरून आणि पैसे देण्याच्या कारणावरून कायम वाद व्हायचे, आज वाद विकोपाला गेले आणि त्यानंतर बाबांनीच आईला गळा दाबून मारून टाकलं असं सांगितलं. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विजेच्या खांबावरुन उडी घेतल्यानंतरही 'तो' सुखरूप

खेड : घरातील मानसिक त्रासामुळे जीवन संपवण्याच्या उद्देशाने विद्युत खांबावर चढलेला तरुण खेड सिटीमधील ग्रामस्थ तसेच पोलिसांच्या मदतीने सुखरूप मिळाला. ही घटना मंगळवारी (दि. ६) खेड सिटीत निमगावच्या हद्दीत घडली.

या घटनेबाबत सविस्तर माहिती अशी की, निमगाव येथे खेड सिटी भागात एक २२ वर्षीय तरुण घरातील मानसिक ताणामुळे जीवन संपवण्याच्या उद्देशाने दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अमुल डेअरीच्या परिसरातील विद्युत वाहक खांबावर चढला. सुमारे दोन तास तो वर बसून होता. विद्युत प्रवाह सुरू होता.स्थानिक नागरिकांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर त्यांनी खांबावरील विद्युत प्रवाह तातडीने बंद केला. पोलिसांना कळवण्यात आले. या तरुणाला खाली येण्याची विनवणी पोलिस व नागरिक करत होते; मात्र तो खाली येत नव्हता. तुम्ही जर वर आले, तर मी उडी टाकीन, अशी धमकी तो वारंवार देत होता.पोलिस हवालदार मोहन अवघडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी त्याचा जीव वाचवण्यासाठी वीजवाहक खांबाखाली जाळी धरुन ठेवली होती. जीवन संपवण्याच्या उद्देशाने उडी मारताना तो जाळीत पडल्यामुळे त्याचा जीव वाचला.

# मतं घेतली, आता पाठ फिरवली...', सांत्वन करण्यासाठी आलेल्या सुप्रिया सुळेंवर शेतकर्यांकडून प्रश्नांचा भडीमार

पुणे । प्रतिनिधी

दिवे - पुरंदर विमानतळ प्रकल्पाला विरोध करणारे स्थानिक शेतकरी आणि पोलिसांत शनिवारी (दि. ३) जोरदार झटापट झाली. याच कालावधीत कुंभारवळणमध्ये एका महिलेचे निधन झाले. या नंतर संबधित महिलेच्या कुटुंबीयांचे



सांत्वन करण्यासाठी आलेल्या खा. सुप्रिया सुळे यांच्यावर शेतकर्यांनी अक्षरशः प्रश्नांचा भडीमार केला. तुम्हाला मतदान मिळावे म्हणून रात्रंदिवस प्रचार केला, मात्र एवढा मोठा प्रकार होवूनही तुमचा एकही पदाधिकारी साधा फिरकला देखील नाही. अशा शब्दात त्यांना शेतकर्यांनी निरुत्तर केले. तुम्ही विमानतळाच्या बाजूने का शेतकर्यांच्या? असाही प्रश्न जाहीरपणे विचारला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी, कुंभारवळण या सात गावातील शेतकर्यांनी विमानतळ प्रकल्पाला जाहीरपणे विरोध केला असून कित्येक दिवस त्याविरोधात आंदोलन सुरु आहे. मागील महिन्यात सासवड येथील प्रशासकीय कार्यालाय्समोर तीन दिवस उपोषण केले, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा देखील नेला .प्रकल्पबाधित गावांमध्ये जमिनीचा सर्व्हे करण्यास विरोध करणार्या शेतकर्यांवर पोलिसांकडून अमानुषपणे लाठीहल्ला झाला. यामध्ये कित्येक शेतकरी जखमी झाले. मात्र पोलिसांनी शेतकर्यांवर गुन्हे दाखल करून अटकही केली. याची दखल संपूर्ण राज्यस्तरावरून घेण्यात आली. मात्र मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादीच्या एकही पदाधिकार्याने शेतकर्यांची साधी विचारपूस सुद्धा केली नाही त्यामुळे शेतकर्यांचा मोठ्या प्रमाणात रोष होता.

# 'दि लॉयर्स कन्झ्युमर्स' सोसायटीच्या चेअरमनपदी अॅड. रेखा करंडे

**पुणे । प्रतिनिधी**

'दि पुना लॉयर्स कन्झ्युमर्स को-ऑपरेटीव्ह' सोसायटीच्या चेअरमनपदी अॅड. रेखा करंडे (दांगट पाटील) यांची निवड झाली आहे. शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील सोसायटीच्या कार्यालयात सोमवारी (दि. ५) चेअरमनपदासाठीची निवडणुक प्रक्रिया पार



पडली. यामध्ये त्या विजयी झाल्या. अध्यक्ष अॅड. हेमंत गुंड यांनी राजीनामा दिल्याने चेअरमनचे पद रिक्त झाले होते. त्यामुळे झालेल्या निवडणूकीत १६ संचालकांनी मतदान केले. त्यामध्ये, करंडे यांना १० मते मिळाली. अध्यासी अधिकारी म्हणून व्ही. एल. सुपेकर यांनी काम पाहिले. लॉयर्स कन्झ्युमर्स ही राज्यात एकमेव वकिलांची सोसायटी आहे. संस्थेचे नऊ हजार वकील सभासद आहेत. संस्थेतर्फे संस्थेच्या सभासदांना व ग्राहकांना स्टॅम्प पेपर, ई-चलन, लिव्ह अँड लायसन्स आणि न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असणारी स्टेशनरी पुरविली जाते.